संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३१-४७/३७ | पाने ८ | किंमत ३ रुपये | अहिल्यानगर, शनिवार दि. २७.०९.२०२५ | अंक नं. १५१ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020



Arihant Tours & Travels

चला फिरायला केरळ

१४,९९९ रुपये प्रती व्यक्ती | ३० नोव्हेंबर ते ०७ डिसेंबर २०२५

ग्रुप टूर

बुकिंगसाठी संपर्क करा :- 9145485858 | 9130875858 | 8306111158

ऑफिस पत्ता : अरिहंत टूर्स अँड ट्रॅव्हल्स, ओला शोरूम जवळ, नगर पुणे रोड, माणिक नगर, अहिल्यानगर, महाराष्ट्र.



डबल फायदा

सर्व दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹ 888/-*

+

जेवढ्या वजनाचे सोने तेवढ्या वजनाची चांदी

चक्क फ्री*

Conditions Apply*

चंदुकाका ज्वेल्स

सोनेरी नातं..

शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,

सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02





२८ सप्टें

"वाढदिवस आपला आमच्या मनात लिहीला आहे प्रत्येक दिन आपणास शुभेच्छा देत आहोत..."

मा.श्री. विलास छबुराव लांडगे (पहिलवान)

आपणांस वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा..!

शुभेच्छुक

श्री. राजुमामा दत्तात्रय जाधव — अध्यक्ष- जंगुभाई तालिम (ट्रस्ट), सिध्देश्वर तरूण मंडळ

मा.श्री.ॲड. धनंजय कृष्णा जाधव — (मा.नगरसेवक) म.न.पा. अ.नगर



सुवर्णसंधी..!

भाड्याने देणे

९०० स्क्वे.फूट असलेली दोन मजली नवीन कन्स्ट्रक्शन २४ तास पिण्याचे पाण्याची टाकी, अटॅच बोरवेल, अटॅच टॉयलेट असलेली बिल्डिंग मेडिकल, होलसेल, पतसंस्था, ऑफिसेस, रिटेलसाठी भाड्याने देणे

अमृत डिस्ट्रिब्युटरशेजारी

नवीन देशपांडे हॉस्पिटलसमोर, लक्ष्मीबाई कारंजा, अ.नगर

8329520865



किंमतीत कमी.. क्वालीटीची हमी...

मजबुत टीकाऊ १२० किलो लोड पेलणारी ॲल्युमीनीयम लॅडर (शिडी)

3 ft. पासुन उपलब्ध

केवल अगरबत्ती

रसरंग मिसळ समोर अडते बाजार, अ.नगर



नवरात्री स्पेशल

उपवासासाठी स्पेशल

टक्कर मलाई लस्सी

कैलास उडपी लस्सी

शाखा नं. १ : शिवशक्ती अपार्टमेंट, खिस्त गल्ली, [illegible], अहिल्यानगर.

शाखा नं. २ : तहसील कार्यालया समोर, टीव्ही सेंटर, सावेडी, अहिल्यानगर.

शाखा नं. ३ : पद्मावती पेट्रोल पंपाजवळ, नगर मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर.



आता आपली टू-व्हीलर, कार, ट्रक चोरी जाण्याची भितीच संपली...

कारण आपल्या सेवेत WheelsEye अॅथोराइज सिस्टम आली आहे.

GPS Tracker | 5G मध्ये उपलब्ध

वाहन चोरीपासून सुटका मिळवा.

आता तुम्ही तुमचे वाहन चोरी जाण्यापासून वाचनू शकता.

तसेच २४ तास तुम्ही तुमच्या वाहनावर जी.पी.एस. ट्रॅकरच्या मदतीने लक्ष्य ठेवू शकता.

२४ तास कंपनी सपोर्ट

* 24x7 Proper टाईम आणि Proper जागा दाखवते.
* Proper OTP आधारीत लॉगिन केले जाते.
* २० पेक्षा जास्त Report आणि वेगवेगळ्या टेम्प्लेट
* Waterproof Dustproof
* जवळील पोलीस स्टेशनची माहिती देते.
* गाडी मोबाईलमधून बंद चालू करता येते.

GPS चे फायदे

* अचूक Location दाखवते
* जिओफोन्स (जाळ्यामुळे) अचूक सूचना देते.
* Overspeed आणि Documents Expiry चे सुचना देते.
* गाडीची छेडछाड केल्यास किंवा गाडी चोरी करण्याचा प्रयत्न केल्यास सूचना देतात.
* ग्राहकांचे प्रश्न सोडवितात.

1 वर्ष गॅरंटी

अहिल्यानगर जिल्ह्याचे अधिकृत विक्रेते

सख्खन ऑटोमोबाईल्स् : 8999089153



CAMEL SAGO ATUL FOOD PRODUCTS

कॅमल सुपरफाईन शाबुदाणा

1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध

कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध

सर्व किराणा दुकानात उपलब्ध

स्टॉकिस्ट

अशोक बन्सीलाल पारख

कॅमल हाऊस, आडते बाजार, अहिल्यानगर

(0241) 2343896/2341196





सणासुदीची चाहूल लागली, लग्नसराईची तयारी सुरू झाली की घरात आनंद, उत्साह आणि परंपरेची रंगत फुलते. तेव्हा घरातील प्रत्येकजणाची लगबग सुरु होते ती आपल्या मनपसंद वस्त्रखरेदीची त्या क्षणी प्रत्येक वस्त्र फक्त कापड नसते ती असते प्रेम, नातं, जपलेली परंपरा ! आणि तीच परंपरा, त्या भावना आणि आधुनिकतेची झलक घेऊन पेशवाई श्रीमंतचा वस्त्रोत्सव तुमच्यासाठी सजला आहे. महिलांसाठी पैठणी, पारंपरिक व डिझाइनर साड्या, घागरा व पुरुषांसाठी एथनिक वेअर, ब्रँडेड रेडिमेडस्, सूटिंग-शर्टिंग व ॲक्सेसरीज. कारण सण असो वा लग्नसराई कपडे हेच आठवणी जपतात, आणि प्रत्येक क्षणाला कायमस्वरूपी खास बनवतात. या सणासुदीची किंवा लग्नसराईची तयारी करा थोडी वेगळी, थोडी खास,
'पेशवाई – श्रीमंत' च्या वस्त्रोत्सव सोबत!

वस्त्रोत्सव

लग्न बस्त्या ची खास सोय.

पेशवाई | श्रीमंत

सर्जेपुरा, अहिल्या नगर. | कुमठेकर रस्ता, पुणे.

0241 2325002/3/4 | 020 24453730 / 24430150

/peshwaishrimant | www.peshwaishrimant.com

* पैठणी * पारंपारिक साड्या * डिझायनर साड्या * घागरा * एथनिक * ब्रँडेड रेडीमेड्स * सूटिंग * शर्टिंग * ॲक्सेसरीज

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# पंचायत समिती सभापती पदासाठी ७ ऑक्टोंबरला आरक्षण सोडत

नगर - जिल्ह्यातील १३ पंचायत समिती सभापती पदांसाठीची आरक्षण सोडत ७ ऑक्टोबर रोजी दुपारी १२ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील पंडित नेहरू सभागृहात काढण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या अध्यक्षतेखाली ही आरक्षण सोडत काढली जाणार आहे.

ग्रामविकास विभागाच्या ९ सप्टेंबर रोजीच्या अधिसूचनेनुसार, राज्यातील पंचायत समित्यांमध्ये सभापती पदासाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि महिलांसाठी (या सर्व प्रवर्गातील महिलांसह) आरक्षण निश्चित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. याच निर्देशानुसार ही सोडत प्रक्रिया पार पडत आहे.

अकोले पंचायत समितीचे सभापती पद अनुसूचित जमातीसाठी निश्चित करण्यात आले आहे. पंचायत समिती सभापती पदासाठी एकूण १३ पदे आरक्षित करण्यात आली आहेत. यामध्ये अनुसूचित जातीसाठी १, अनुसूचित जाती (महिला)साठी १, अनुसूचित जमाती (महिला)साठी १, नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी २, नागरिकांच्या मागास प्रवर्गासाठी (महिला) २, सर्वसाधारणसाठी ३ आणि सर्वसाधारण (महिला)साठी ३ पदे आरक्षित आहेत.

नागरिकांनी या आरक्षण सोडत बैठकीला उपस्थित राहावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी (महसूल) यांनी केले आहे.

## अहिल्यानगर जिल्ह्यात २९ सप्टेंबरपर्यंत पावसाचा 'यलो अलर्ट' : हवामान विभाग

नगर - भारतीय हवामान खात्याने दिलेल्या अंदाजानुसार २७ ते २९ सप्टेंबर या कालावधीत अहिल्यानगर जिल्ह्यात वीजांचा कडकडाट, जोरदार वारे व मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासनाने अहिल्यानगर जिल्ह्यासाठी 'यलो अलर्ट'जारी करून नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

### नद्यांच्या विसर्गात वाढ; पूरस्थितीचा धोका

पुणे, नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यातील धरणांमधून पाण्याचा विसर्ग वाढला असून त्यामुळे जिल्ह्यातून वाहणाऱ्या नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत आहे. नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क राहावे, असे आवाहन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे. सध्या भिमा नदीवर दौंड पूल येथे ७,९४० क्युसेक, गोदावरी नदीवरील नांदूर मध्यमेश्वर धरणातून ९,४६५ क्युसेक, जायकवाडी धरणातून ३७,७२८ क्युसेक, प्रवरा नदीवरील भंडारदरा धरणातून ८२० क्यूसेक, निळवंडे धरणातून १,५२१ क्यूसेक, ओझर बंधारा १,८८२ क्युसेक, मुळा धरणातून २,००० क्युसेक, घोड धरणातून ५,००० क्युसेक, सीना धरणातून ३,०७० क्युसेक, कुकडी नदीवरील येडगांव धरणातून ६०० क्युसेक, हंगा नदीवरील विसापूर धरणातून ५५० क्युसेक, खैरी धरण येथून १३,२४३ इतका विसर्ग सुरू आहे.

### प्रशासनाकडून नागरिकांना सूचना

मेघगर्जनेच्या वेळी, विजा चमकत असताना किंवा वादळी वारे वाहत असतांना झाडाखाली किंवा झाडांजवळ उभे राहू नये. वीजेपासून बचावासाठी सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा.

गडगडाटीच्या वादळादरम्यान व विजा चमकतांना कोणत्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नये, वीजेच्या सुवाहक भागांशी संपर्क टाळावा, ट्रॅक्टर्स, शेतीची अवजारे, मोटारसायकल / सायकल यांचेपासून दूर रहावे.

मोकळे मैदान, झाडाखाली, टॉवर्स, ध्वजांचे खांब, विद्युत / दिव्यांचे खांब, धातूचे कुंपण, विदयुतवाहिनी अथवा ट्रॉन्सफॉर्मजवळ थांबू नये. सर्व प्रकारच्या अधांतरी लटकणाऱ्या / लोंबणाऱ्या केबल्स् पासून दूर रहावे.

जाहिरात फलक (होर्डिंग्ज) कोसळून होणाऱ्या दूर्घटना टाळण्यासाठी दक्षतेची बाब म्हणून जाहिरात फलकांच्या (होर्डिंग्ज) आजूबाजूला थांबू नये व योग्य ती दक्षता घ्यावी,

विजा चमकत असताना मोकळ्या जागेवर असल्यास सुरक्षेसाठी गुडघ्यावर बसून हाताने आपले कान झाकावे व आपले डोके दोन्ही गुडघ्यांच्यामध्ये झाकावे, जमीनीशी कमीतकमी संपर्क असावा.

धरण व नदीक्षेत्रामध्ये पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी, धरणाचे पाण्यात वा नदीच्या पाण्याच्या प्रवाहामध्ये उतरू नये, धोकादायक ठिकाणी सेल्फी (Selfie) काढू नये.

नदी, ओढे व नाल्याकाठच्या नागरिकांनी दक्ष रहावे. पाणीपातळीत वाढ होत असल्यास नागरिकांनी नदीपात्रापासुन तसेच ओढे व नाले यापासून दूर रहावे व सुरक्षीत स्थळी स्थलांतर करावे. नदी, ओढे-नाल्यांवरील पुल व बंधा-यांवरुन पाणी वाहत असल्यास पुल/बंधारे ओलांडू नये.

नागरिकांनी स्थानिक प्रशासनाने दिलेल्या सुचनांचे पालन करावे. आपत्कालीन परिस्थिती उद्भवण्यापूर्वीच सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे.

जुनाट/मोडकळीस आलेल्या व धोकादायक इमारतीमध्ये आश्रय घेऊ नये.

अतिवृष्टीमुळे भूस्खलन होण्याची व दरडी कोसळण्याची शक्यता असते. त्यादृष्टीने डोंगराच्या पायथ्याशी राहणाऱ्या लोकांनी दक्षता घ्यावी व वेळीच सुरक्षीत स्थळी स्थलांतर करावे. घाट रस्त्याने प्रवास करणे शक्यतो टाळावे.

### जनावरांचे सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे

जिल्हा नियंत्रण कक्षाचा टोल-फ्री क्रमांक १०७७ असून दूरध्वनी क्रमांक ०२४१-२३२३८४४ व २३५६९४० उपलब्ध आहेत, असे आवाहनही करण्यात आले आहे.

## अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे २ दिवसात पूर्ण करा; आपत्तीच्या काळात कोणीही मुख्यालय सोडू नये : जिल्हाधिकारी


जिल्हाधिकारी कार्यालयात अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे झालेल्या नुकसानीच्या आढावा बैठकित बोलताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया.

नगर - जिल्ह्यात अतिवृष्टी व पुरामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे येत्या दोन दिवसांत प्राधान्याने पूर्ण करावे, असे जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी निर्देश दिले. जिल्ह्याला २७ व २८ सप्टेंबरला 'यलो अलर्ट' जारी करण्यात आला असून या आपत्तीच्या काळात कुठलाही अधिकारी किंवा कर्मचारी मुख्यालय सोडू नये, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे झालेल्या नुकसानीच्या आढाव्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. आशिया बोलत होते.

बैठकीस निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते, जिल्हा अधीक्षक सुधाकर बोराळे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता लक्ष्मीकांत जाधव, जिल्हा नियोजन अधिकारी दीपक दातीर, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. वीरेंद्र बडदे यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी व सर्व उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व तालुकास्तरीय अधिकारी दूरदृष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले की, पावसामुळे ज्या भागातील बंधारे व पाझर तलाव नुकसानग्रस्त झाले आहेत, त्यांची तातडीने दुरुस्ती करावी. यासाठी आवश्यक यंत्रे व मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात यावे. आवश्यकता भासल्यास इतर जिल्ह्यातून किंवा स्वयंसेवी संस्थांकडून उपलब्ध असलेली यंत्रे वापरून काम प्राधान्याने पूर्ण करावे.

जिल्ह्यात ज्या ठिकाणच्या पूलांमध्ये नुकसान झाले आहे किंवा पुलांचे कठडे तुटले आहेत, ती दुरुस्त करून वाहतुकीला अडथळा येऊ नये, याची काळजी घ्यावी. संपर्क तुटलेल्या गावांचा संपर्क लवकरात लवकर सुधारावा.

आपत्तीच्या काळात गावांमधील वीज पुरवठा सुरळीत राहावा, यासाठी दक्षता घेणे आवश्यक आहे. पुरामुळे प्रभावित झालेल्या गावठाण फीडर तातडीने दुरुस्त कराव्यात. तसेच पाणीपुरवठा योजना अखंडित राहील याचीही खात्री करावी.

पावसामुळे पाणीपुरवठ्याच्या लाईन्स बाधित झाल्यास त्यांची दुरुस्ती करावी. प्रत्येक गावातील नागरिकांना शुद्ध पाणी पुरवठा होईल यासाठी पाण्याचे नमुने तपासणे आवश्यक आहे. तसेच पूर आलेल्या गावांमध्ये स्वच्छता करावी, औषधसाठा पुरेसा ठेवावा व पशुधनासाठी पर्यायी व्यवस्था उपलब्ध करून द्यावी.

आपत्तीच्या काळात तालुका स्तरावर तहसीलदार, गट विकास अधिकारी व कृषी अधिकारी टीमवर्कने काम करतील. प्रत्येक अधिकारी व कर्मचारी फील्डवर राहतील, अशा सूचनाही त्यानी दिल्या.

## कोलोरेक्टल सर्जन्स असोसिएशन ऑफ इंडियाच्या राष्ट्रीय परिषदेमध्ये डॉ. शौनक तुवर यांना दीक्षांत प्रदान



नगर - डॉ. शौनक सुभाष तुवर यांना नुकतेच अहमदाबाद येथे झालेल्या कोलोरेक्टल सर्जन्स असोसिएशन ऑफ इंडिया (ACRSI) च्या राष्ट्रीय परिषदेमध्ये दीक्षांत प्रदान करण्यात आले.

ते ACRSI परीक्षेची तीनही पातळी यशस्वीरीत्या पार करणारे अहिल्यानगर येथील पहिलेच तसेच तरुण सर्जन ठरले आहेत.

युरोपियन सोसायटी ऑफ कोलोप्रोक्टोलॉजी (ESCP) च्या सहकार्याने घेतली जाणारी ACRSI फेलोशिप परीक्षा ही कोलोरेक्टल सर्जरी क्षेत्रातील सर्वात कठीण परीक्षा मानली जाते. १९९९ साली या परीक्षेची सुरुवात झाल्यापासून आजपर्यंत संपूर्ण भारतातून केवळ ३७९ सर्जन्सनीच ही परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे.

डॉ. शौनक यांनी आपले MBBS शिक्षण मुंबई येथील KEM रुग्णालयातून पूर्ण केले असून, MS (जनरल सर्जरी) चे शिक्षण पिंपरी-चिंचवड येथील YCM रुग्णालयातून पूर्ण केले आहे. त्यांनी पुण्याच्या जहांगीर हॉस्पिटलमध्ये फेलोशिप प्रशिक्षण पूर्ण केले आहे. तसेच ते रुबी हॉल हॉस्पिटलमध्ये पॅनल कन्सल्टंट होते.

आता ते पाईल्स, फिशर, फिस्टुला, कोलोरेक्टल कॅन्सर व इतर कोलोरेक्टल आजारांनी पीडित रुग्णांची सेवा अधिक कौशल्य आणि करुणेने करण्यास अहिल्यानगर मध्ये उपलब्ध असतील.

डॉ. शौनक हे भूलतज्ज्ञ व अस्थिरोगतज्ज्ञ डॉ. सुभाष तुवर यांचे पुत्र आहेत.

## रस्त्यांची दुरुस्ती व कचरा संकलनाचा प्रश्न तातडीने मार्गी लावा अन्यथा अहिल्यानगर महापालिकेविरोधात जनआंदोलन छेडणार


कचरा संकलन व रस्ते दुरुस्तीबाबत, तातडीने निकाली न काढल्यास अहिल्यानगर महापालिकेविरोधात जनआंदोलन छेडण्याचा इशारा निवेदनाद्वारे महानगरपालिका आयुक्तांना निवेदन देण्यात आले.

नगर - शहरातील कचरा संकलन, रस्ते दुरुस्ती आणि बंद गटार पाईपलाइनच्या कामांबाबत नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. महानगरपालिका कराच्या स्वरूपात जनतेकडून कोट्यवधी रुपये वसूल करते, राज्य सरकारकडून घनकचरा व्यवस्थापनासाठी १० ते १४ कोटी रुपयांचा निधीही मिळतो; तरीही शहरात नियमित कचरा संकलन होत नसल्याने नागरिकांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो आहे. राज्यस्तरीय स्वच्छता पुरस्कार पालिकेला मिळाला तरी तो कोणत्या निकषांवर मिळाला, असा सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

बांधकाम खात्याच्या कामकाजाबाबतही नागरिक आक्रमक झाले आहेत. अनेक ठिकाणी रस्त्यांची कामे अर्धवट सोडण्यात आली असून त्यामुळे मोठ्या प्रमाणात वाहनांचे नुकसान होत आहे. बंद गटार पाइपलाइनची कामे केवळ वरवर झाकण बसविण्यापुरती मर्यादित असल्याचा आरोप होत असून आतील कामे अपूर्ण असल्याचे समोर आले आहे. संबंधित विभागाचे अधिकारी आणि ठेकेदार यांच्यातील संगनमतामुळे निकृष्ट कामाला मंजुरी देऊन थेट बिल अदा केले जात असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. यामुळे राज्य शासनाच्या तसेच सर्वसामान्य जनतेच्या पैशांची उघड लूट सुरू असल्याचे चित्र दिसते.

अहिल्यानगर महानगरपालिका आयुक्त दालनात छत्रपती शिवाजी महाराज यांच्यासह महात्मा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे फोटो लावण्याची मागणी करण्यात आली आहे. सर्व बाबी तातडीने निकाली न काढल्यास अहिल्यानगर महानगरपालिकेविरोधात जनआंदोलन छेडले जाईल, असा इशारा वंचित बहुजन आघाडी च्या वतीने देण्यात आला आहे.

यावेळी योगेश साठे, राजीव भिंगारदिवे, हनीफ शेख, जे. डी. शिरसाठ, रविकिरण जाधव, ॲड.योगेश गुंजाळ, फिरोज पठाण आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## डी.एल.एड. परीक्षेमध्ये सुजाता मरकड प्रथम



नगर - पाथर्डी तालुक्यातील तिसगाव येथील रहिवासी सौ. सुजाता चैतन्य मरकड यांनी महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद पुणे यांच्यामार्फत आयोजित केलेल्या डी. एल. एड. या परीक्षेमध्ये ८८.८५ % गुण मिळून प्रथम क्रमांक मिळविला.


या सध्या दादा पाटील राजळे शिक्षण संस्थेचे, लोकनेते आप्पासाहेब राजळे कॉलेज ऑफ फार्मसी आदिनाथनगर येथे Lab Technician या पदावर कार्यरत आहेत. या यशाबद्दल आमदार मोनिकाताई राजळे, पाथर्डी दूध संघाचे अध्यक्ष राहुल राजळे, फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. शांताराम खणगे, सभापती काशिनाथ पाटील लवांडे, निवडुंगे गावचे सरपंच वैभव देशमुख, कानिफनाथ देवस्थान ट्रस्ट मढीचे माजी उपाध्यक्ष किशोर मरकड व ग्रामस्थ यांनी अभिनंदन केले.

## मुकुंदनगरमध्ये चॉपरने वार करून तरुणाच्या खुनाचा प्रयत्न; गुन्हा दाखल

नगर - शहरातील मुकुंदनगर भागात असलेल्या बडी मस्जीद परिसरात ८ ते १० जणांच्या टोळक्याने तरुणावर चॉपर, लोखंडी रॉड, लाकडी दांडक्याने मारहाण करत त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना २५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास घडली. या हल्लयात रेहान रऊफ शेख (वय २७, रा.झेंडीगेट) हा जखमी झाला आहे. त्याने दवाखान्यात उपचार घेत असताना दिलेल्या जबाबा वरून दानिश उर्फ धन्या, साहिल उर्फ बाऊ, उपेरलाला, नाजीश, अफनान, तालीम व इतर ३ ते ४ अनोळखी इसमांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या आरोपींनी हातात लाकडी दांडके, लोखंडी रॉड, चॉपर घेवून येत फिर्यादी रेहान वर हल्ला केला. याला पेट्रोल टाकून जाळू असे म्हणत जीवे मारण्याची धमकी दिली. असे फिर्यादीत म्हटले आहे.


अहिल्यानगरमध्ये हल्ला झालेल्या लक्ष्मण हाके यांची गाडी.

## अशोक भंडारी यांचे अल्प आजाराने निधन



नगर - सावेडी वैदूवाडी परिसरातील रहिवासी अशोक चांदमल भंडारी (शिराळचिचोंडीवाला, वय ७५) यांचे २७ सप्टेंबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, ३ मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## लिलाबाई छल्लाणी यांचे वृध्दापकाळाने निधन



श्रीरामपूर - येथील श्रीमती लिलाबाई स्वरूपचंद छल्लाणी (वय ८७) यांचे २६ सप्टेंबर रोजी रोजी वृध्दापकाळाने निधन झाले.

आनंद छल्लाणी यांच्या मातोश्री, ताराचंद, प्रविण व प्रदिप छल्लाणी यांच्या चुलती होत.

## ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या गाडीवर अहिल्यानगरमध्ये हल्ला

### नगर-दौंड महामार्गावरील घटना, पोलिसांनी हल्लेखोरांना घेतले ताब्यात

नगर - ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या गाडीवर अज्ञातांनी हल्ला केला आहे. नगर-दौंड महामार्गावरील खंडाळा शिवारात हॉटेल सारंगीजवळ २७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ च्या सुमारास हा हल्ला झाला. या हल्ल्यात गाड्यांची काच फुटली असून एका कार्यकर्त्याला दुखापत झाली आहे. त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, लक्ष्मण हाके पाथर्डी तालुक्यातील दैत्य नांदूर येथे नियोजित कार्यक्रमासाठी जात होते. यावेळी नगर-दौंड महामार्गावर अज्ञातांनी त्यांच्या गाडीवर हल्ला केला. यामुळे एकच गोंधळ उडाला. पोलिसांनी हस्तक्षेप करत परिस्थिती नियंत्रणात आणली.

'हा हल्ला कोणी केला हे मला माहिती नाही. पण आमच्या दोन गाड्यांचा चक्काचूर झाला आहे. गाडीत असलेला एक कार्यकर्ता जखमी झाला आहे. याआधी माझ्यावर सात-आठ वेळा हल्ले झालेले आहेत. मी पोलिसांना देखील आधीच सांगितले होते. पण आता मी काही बोलणार नाही. सरकारला आम्ही वारंवार सांगितले, आता बोलून काही उपयोग नाही', अशी उद्विग्न प्रतिक्रिया हाके यांनी दिली. दरम्यान घटनेची माहिती मिळताच नगर तालुका पोलीस ठाण्याचे स.पो.नि. प्रल्हाद गिते यांनी पोलिस पथकासह घटनास्थळी धाव घेत मराठा आंदोलक गोरख दळवी यांना ताब्यात घेतले आहे. याबाबत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया दुपारी उशिरा पर्यंत सुरु होती.

## दि पुना मर्चंट चेंबरच्या स्वीकृत सदस्यपदी 'सिद्धी ग्रुप'चे मुकेश छाजेड यांची निवड



पुणे - दि पुना मर्चंट चेंबरच्या स्वीकृत सदस्यपदी पुण्यातील जैन समाजातील उद्योजक सिद्धी ग्रुपचे सदस्य मुकेश छाजेड यांची निवड झाली आहे.

मुकेश छाजेड यांनी समाजहितासाठी अनेक उपक्रम राबवले आहेत. ग्रुपच्या माध्यमातून त्यांनी रक्तदान शिबिरे आयोजित केली, आपत्कालीन प्रसंगी गरजूंपर्यंत मदत पोहोचवली आणि पुण्यात धार्मिक सेवांची परंपरा जोपासली. कोरोना काळात त्यांनी 'जीतो'च्या माध्यमातून लोकांसाठी रुग्णालये उपलब्ध करून दिली तसेच अन्नधान्याचे किट्स वाटप करून शेकडो कुटुंबांना आधार दिला. सध्या ते जीतो पुणेचे डायरेक्टर म्हणून कार्यरत असून सेवाभाव, सामाजिक बांधिलकी आणि एकतेचा संदेश सातत्याने पोहोचवत आहेत.

निवडीबद्दल बोलताना मुकेश छाजेड म्हणाले ही निवड माझ्यासाठी केवळ सन्मान नाही, तर समाजासाठी आणखी काही करण्याची मोठी संधी आहे. समाजाच्या विश्वासाला उतरून अधिकाधिक सेवाभावी उपक्रम राबवण्याचा माझा संकल्प आहे.


मनपाच्या आरोग्य विभागातर्फे औषधी विक्रेता दिवस साजरा करण्यात आला.

## मनपाच्या आरोग्य विभागातर्फे औषधी विक्रेता दिवस साजरा

नगर - महानगरपालिका आरोग्य विभागाच्या वतीने जागतिक औषधी विक्रेता दिवस साजरा करण्यात आला. या निमित्ताने शहरातील औषध विक्रेते संजय गुगळे यांच्यासह मनपाचे औषध निर्माण अधिकारी व फार्मासिस्ट यांचा गौरव करून सत्कार करण्यात आला. सत्कार सोहळा मनपाचे आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर यांच्या हस्ते पार पडला.

या कार्यक्रमात डॉ. दिलीप बागुल, भाऊसाहेब सुडके, विकास गीते, सचिन काळभोर, किरण खरात, जावेद रंगरेज, योगेश औटी, अजय लोळगे, सुमित जाधव, तुषार बेरड आदी औषध निर्माण अधिकारी व फार्मासिस्टांचा विशेष सत्कार करण्यात आला.

# गृहिणी

## आरोग्य

एखाद्याला घोरण्याबद्दल सतत चिडवलं जातं. मस्करीला सामोरं जावं लागतं. चारचौघांतही टीका सोसावी लागते, पण हसून दुर्लक्ष करण्याएवढा हा विषय साधा नाही. कदाचित हे एखाद्या मोठ्या दुखण्याचे संकेत असू शकते. कदाचित हे संधिवाताचे लक्षण असू शकेल.

हा एक हाडासंबंधी आजार आहे. आठवड्यातून तीन-चार वेळा बिअर घेणाऱ्यांनाही तो संभवतो. ही व्याधी अपंग बनवणारी आहे. काही प्रसंगी पेशंट बेडवरून उठू देखील शकत नाही. साधारणत: २० ते ५० वयोगटातील महिला या व्याधीनं प्रभावित होऊ शकतात. यामुळे स्नायूमधील शक्ती कमी होते आणि लवचिकता कमी झाल्याने व्यक्ती पूर्ण कार्यक्षमतेने काम करू शकत नाही.

## पाककला

### राघवदास लाडू

**साहित्य** : हरभरा डाळीचा रवा ४ वाट्या, १ वाटी साजूक तूप, अर्धी वाटी खवा, २ वाट्या साखर, १ चमचा वेलदोडे पूड, काजू, बेदाणे.

**कृती** : हरभरा डाळीचा रवा दूध घालून घट्ट भिजवून ठेवावा. २ तासांनंतर तूप घालून रवा मोकळा करून खमंग भाजावा. खवा भाजून त्यात मिसळावा. साखरेत पाणी घालून दोन तारी पाक करावा. पाकात रवा, खवा, वेलदोडे पूड घालून मिश्रण एकसारखे करून ठेवावे. २-३ तासांनी लाडू वळावेत. वरून काजू, बेदाणे बसवावेत. राघवदास लाडू खूप चवदार, खमंग लागतो. शक्तिवर्धक आहे. आठ दिवस टिकतो.

## सल्ला

जर फ्रिजमध्ये अगोदरच कणीक मळून ठेवली असेल तर ती चपात्या करण्याच्या दहा पंधरा मिनिटे अगोदरच बाहेर काढून ठेवावी.

## वास्तू

* मुख्य दरवाजानुसार विजेचा किंवा सिमेंटचा खांब असणेही अशुभ आहे.
* मुख्य दरवाजासमोर तुळस लावावी.
* मुख्य दरवाजासमोर दररोज स्वस्तिकची रांगोळी काढावी.

## सौंदर्य

दूध, साय व मध एकत्र करून रात्री झोपताना त्याचा लेप चेहऱ्यावर लावावा. दुसऱ्या दिवशी सकाळी कोमट पाण्याने चेहरा धुतला की, त्वचा नरम पडते. आर्द्रता वाढते. रखरखीतपणा नाहीसा होतो. यामुळे मुरुम-पुटकुळ्याही नष्ट होतात.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

रविवार, दि. २८ सप्टेंबर २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आश्विन शुक्लपक्ष, ज्येष्ठा २७।५५, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ३३ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आरोप-प्रत्यारोपांपासून दूर रहा. मोठ्यांचा सल्ला घ्या. आरोग्य चांगले राहील. एखाद्या जुन्या मित्राशी भेट होईल. व्यापारात बुद्धिमत्ता, दूरदर्शितेची प्रशंसा होईल.

**वृषभ** : आरोग्याच्या दृष्टीने ही वेळ उत्तम आहे. इच्छित कार्य पूर्ण होतील. मनावर नियंत्रण ठेवा. मित्रांचा सहयोग मिळेल. अत्यधिक प्रयत्नांचा अल्प लाभ मिळेल. तणाव अडचणी राहतील.

**मिथुन** : भावनात्मक स्वभावाचे असल्यामुळे आपणास नुकसान होणे शक्य आहे. पैशासंबंधी स्थिती ठीक राहिल. आजचा दिवस जोमदार ठरेल. दिवस संमिश्र जाईल.

**कर्क** : इच्छित विषयांमध्ये यश मिळेल. महत्वपूर्ण कार्यांमध्ये वरिष्ठांची सल्ला घेऊन पाउल टाका. शुभ वार्ता देखील मिळतील. न्यायसंबंधी विषयांमध्ये यश मिळेल.

**सिंह** : वडिलधाऱ्यांचा आधार मिळाल्याने अडकलेली कार्य पूर्ण होईल. कौटुंबिक आनंदाचे वातावरण राहील. आपल्या आवडी-निवडींप्रमाणे कार्य करण्यासाठी आजचा दिवस सर्वांत उत्तम आहे.

**कन्या** : धर्मविषयक कामामध्ये पैसा खर्च होईल. सामुदायिक कार्यांमध्ये अनुकूल साहाय्याबरोबर सन्मान वाढेल. महत्वपूर्ण कार्यांमध्ये यश मिळेल. आपण पूर्वीपासून आपल्या मनात असलेल्या योजनेबद्दल अतिउत्साही आहात.

**तूळ** : आपणास समाधानकारक स्थिती मिळेल. आर्थिक लाभ मिळेल. आरोग्याला त्रास होऊ शकतो. एखादे कार्य झाल्यामुळे आनंदाचा अनुभव येईल. व्यापार-व्यवसाय सुरळीत राहील. योग्य उद्योगात गुंतवणूक केल्यास शेवटी आर्थिक नफा मिळेल.

**वृश्चिक** : भावनांच्या भरात वाहून जाऊन नुकसान होण्याची शक्यता आहे. आर्थिक विषयांमध्ये स्थिती चांगली राहील. कुटुंबियांच्या सहवासामुळे दिवस आनंदात जाईल. आरोग्य मध्यम राहील.

**धनु** : स्त्री पक्षाकडून लाभ मिळेल. संपूर्ण दिवस वातावरण होकारात्मक राहील. खाण्या-पिण्यात काळजी घ्या. दिवस आनंदात जाईल. मागील उधारी वसूल होईल. जोखिम असलेले कार्ये टाळा.


**मकर** : मध्यम स्वरूपाची कार्ये पूर्ण होतील. प्रवासाचे योग संभवतात. कार्यात अडचणी येण्याची शक्यता आहे. दिवस कालच्या इतका सकारात्मक जाणार नाही. अधिकार क्षेत्रात वाढ होईल. काही नवीन संधी मिळतील.

**कुंभ** : आरोग्याची काळजी घ्या. आर्थिक विषयांमध्ये सावधगिरी बाळगा. आर्थिक विषयांमध्ये देवाण-घेवाण टाळा. हसत खेळत वेळ खर्च होईल. पैसे मिळवण्याचा एखादा मार्ग आपल्या स्वतःच्या घरातून मिळू शकतो.

**मीन** : आरोग्य नरम-गरम राहील. मित्र मदत करतील व काही आवश्यक कार्ये पूर्ण होतील. मागील उधारी वसूल होईल. आर्थिक करारांसाठी आजचा दिवस उत्तम आहे. योजनांमध्ये केलेला बदल इतर कामे करण्यासाठी प्रवृत्त करेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## शब्दगंध क्र. ७२७२ सौ.शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) चालण्याची ढब; वर्तणूक; चारित्र्य ३) गणपती; गणेश; गणनायक ७) गरम मसाल्यातील एक पदार्थ ८) शे; शंभर ९) अरबी देव १०) मध्य प्रदेशातील एक शहर १२) गेलेला; दशा; अवस्था; भूत १४) वर्ण; मौज; रंगविण्याचे साधन; कलर १७) बोभाटा; गडबड १९) एक अतिशय मृदू असे सुती कापड २२) उतरण; कडपा; टेकडी; ढाळ २३) जळजळ २४) एक समसंख्या; एका तपातील वर्षांची संख्या २६) धमनी; रक्तवाहिनी; शीर; नाडी २७) रड; रडगाणे २८) एक चर्मवाद्य; गारुड्याजवळचे एक वाद्य

**उभे शब्द :-** १) पांघरण्याचे एक वस्त्र २) घाई; धांदल; त्वरा ३) मुस्लीम पुरुषाचे एक नाव ४) चिनी मातीच्या पेल्यात पाणी घालून त्यातून सप्तस्वर काढणारे वाद्य ५) दहावा ६) वाकलेला; झुकलेला ११) जमीन नांगरणे, पेरणे वगैरे शेतीच्या उपयोगाची कामे १३) फार बारीक व मऊ १५) ज्याला कोणी वारस नाही असे १६) विधानसभा किंवा विधान परिषदेचा सभासद १८) आकाश; नभ; अंबर २०) लाट; तरंग; हुकी २१) खोटा; लुच्चा २५) अयोध्येचा राजा; सीतापती

### शब्दगंध क्र. ७२७१ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : परिश्रमांशिवाय प्राप्त होईल अशी कोणतीही मूल्यवान वस्तू जगात नाही. – **एडिसन.**

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### सिझेरीयन म्हणजे काय?


''सिझेरीयन झाले शेवटी'', ''सिझेरीयनशिवाय गत्यंतर नाही, असे डॉक्टर म्हणाले'' अशी वाक्ये मॅटर्निटी हॉस्पिटलमध्ये वारंवार ऐकू येतात. बाळंतपणासाठी गेलेली स्त्री सात-आठ दिवस बिछान्यावर पडून असते. नंतर टाके काढल्यानंतर तिला घरी जाऊ देतात. एकूण सिझेरीयन व बाळंतपण यांचा संबंध आहे, हे आपल्या लक्षात आले असेल. ९५% प्रसूती नैसर्गिकरित्या होतात. म्हणजेच मातेच्या योनीमार्गातून बाळ बाहेर येते. काही वेळा मात्र योनीमार्गातून बाळ बाहेर येणे शक्य नसते. बाळाचे डोके मोठे असते वा मातेच्या कमरेच्या हाडांच्या ज्या पोकळीतून बाळ बाहेर येते ती पोकळी खूप लहान असते. कधी माता बाळंतपणाच्या कळा घेऊ शकत नाही. कधी तिचे पूर्व सिझेरियन झालेले असते. या सर्व कारणांमुळे योनीमार्गातून मुलाचा नैसर्गिकरित्या जन्म न होता ते पोटातून काढावे लागते. प्रथम ओटीपोटीवर छेद घेऊन नंतर गर्भाशयाचा छेद घेतल्यानंतर काही क्षणांतच बाळ बाहेर काढले जाते. एकदा मूल बाहेर आले की, मग त्याची काळजी नैसर्गिकरित्या जन्माला आलेल्या मुलाप्रमाणेच घेतली जाते.

### चतुर कोकरु

एका कुरणात एका कोकरांचा कळप चरत होता. चरता चरता त्यातील कोकरे इकडून तिकडे सारखी बागडत होती. खेळण्याच्या नादात एक कोकरू कळप चरत-चरत पुढे गेला तर मागेच राहिले. जवळच्याच कुरणात एक लांडगा कळपावर नजर ठेवून होता. एक कोकरू कळपापासून मागे राहिल्याचे त्याने पाहिले आणि तो त्या कोकराच्या मागे लागला. कोकरू धावू लागले. पण आपण आता लांडग्याच्या तावडीत सापडल्याशिवाय राहत नाही, असे लक्षात येताच ते धावायचे सोडून हसत लांडग्याला म्हणाले, ''लांडगेदादा, आता तुम्ही मला मारून खाणार, हे मी ओळखले आहे. पण मरताना आनंदाने हसत-हसत मरावे, असे मला वाटते.म्हणून तुम्ही थोडा वेळ तुमची बासरी वाजवा म्हणजे मी आनंदाने मरणाला सामोरा जाईन.''

मागणी काही विशेष नसल्याने लांडग्याने ते कोकराचे म्हणणे मान्य केले. त्याने आपली बासरी काढली व ती वाजवू लागला. तसे कोकरू दोन पायावर उभे राहून नाचू लागले. तसा लांडगा बासरी आणखी जोराने वाजवू लागला. बासरीचा आवाज कुत्र्यांच्या कानी पडताच ते तेथे धावून आले. धावून आलेले कुत्रे पाहताच लांडग्याने बासरी दिली फेकून आणि त्याने तेथून पलायन केले.पळता पळता मनाशी म्हणाला,''आपले काम सोडून भलत्या कामात लक्ष घातल्याने अशी फजिती झाली. आपला कसायाचा धंदा सोडून भलत्या कामात लक्ष घातल्याने अशी फजिती झाली. आपला कसायाचा धंदा सोडून वाजंत्र्याचा धंदा केल्याने अगदी प्राणाशी बेतले होते.''

**तात्पर्य** : छंदी माणसाला चतुर लोक सहज फसवू शकतात.



## जीवन का अमृत (भाग १)

### गुरू और परमात्मा

जब हम शरीर में रह रहे होते हैं, तो हमारी आत्मा पर चार मोटे-मोटे परदे पड़े होते हैं। लेकिन जब हम शरीर से ऊपर उठते हैं, तो पिंडी शरीर पीछे रह जाता है। अंड से ऊपर उठते हैं, तो अंडी शरीर पीछे रह जाता है। ब्रह्म से ऊपर उठते हैं, तो ब्रह्मंडी शरीर पीछे रह जाता है। जब ये तीन आवरण उतरते हैं, तो आत्मा पारब्रह्म में पहुँचती है, जहाँ काल का जाल नहीं है। स्वामी जी महाराज फरमा रहे हैं कि हमें और आगे जाना है, सचखंड में जाकर प्रभु से एकमेक होना है। वे हमें समझा रहे हैं कि गुरु हमें सबसे ऊँची अवस्था में पहुँचा देते हैं। आखिर में स्वामी जी महाराज फरमा रहे हैं :

**कहा राधास्वामी अगम विचार ।**
**सुने और माने करे निरवार ।**

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

### आज्ञा चक्र

२. रस चूसनेवाली कीट, पौधों के तना में और बैंगन में आनेवाली कीट के नियंत्रण के लिए ४% गोमूत्र, ५% नीम अर्क या दशपर्णी अर्क में से एक अदली बदली कर छिड़काव करें।

**१४) पत्तागोभी और फूलगोभी की फसल :- वा जमीन को शक्तिशाली बनाने के लिए।**

१. प्रति एकड़ ६ टन गोबर की खाद जमीन में मिलाकर बीज बुवाई के लिए जमीन तैयार करें।

२. पौधे लगाते समय फिर प्रति २० दिन के बाद २०० ली. जीवामृत एक एकड़ जमीन में जमीन गीली हो तब शाम के समय छिड़कायें या पानी के साथ छोड़ दें।

३. फसल एक मास की होने के बाद एक एकड़ जमीन में जमीन गीली हो तब केंचुवे की खाद, ६० किलो अनाज की खाद और नत्र, स्फुरद और पालाश की उपलब्धि करानेवाले जीवाणु संवर्धक प्रति एक किलो मिलाकर जमीन में छोड़ दें।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको - तुमचे माझ्यावर किती प्रेम आहे!!

नवरा - ८२%

बायको - १००% का नाही!!

नवरा - १८% जीएसटी नाही का? असं टॅक्स बुडवून काळ्या धना सारखं काळं प्रेम करणार नाही मी

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* आयएमएफने भारतासाठी मुख्य अर्थशास्त्रज्ञ म्हणून कोणाची नेमणूक केली आहे?

– पियरे ओलिवियर

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास – 'इच्छा, कर्म...'

इच्छा नाही असा व्यक्ती ह्या भुतलावर सापडणार नाही. एखाद्या व्यक्तीची इच्छा अगदी साधी असते तर दुसऱ्या व्यक्तीची इच्छा चांगल्यापैकी मोठी असते. एखाद्या लहानग्याला वाटतं आपल्याला चॉकलेट मिळावं. त्याने घरातल्या सदस्याला सांगितलं तर त्याला चॉकलेट दिलं जातं पण दिवसभरात बऱ्याचवेळा चॉकलट खात असेल तर चॉकलेट दिलं जात नाही. मोठ्यांच्या इच्छेच्या पूर्ततेसाठी, त्यांनाच कर्म करावं लागतं. लहानग्यांची इच्छा पूर्ततेसाठी घरातल्या सदस्याला कर्म करावं लागतं कारण कर्म म्हणजे नेमकं काय हे त्या चिमुकल्यांना कळत नसतं. कर्म खरं तर ही फक्त कृती नाहीय तर मनापासून करावयाचे. इच्छा पूर्ततेसाठीचे श्रम आहेत. माझ्या मते इच्छा आणि कर्म ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत. माझी इच्छा नेमकी कोणती आहे ? चांगल्या इच्छेच्या पूर्ततेसाठी माझे कर्मसुध्दा महत्वाचे आहेत. मनात फक्त चांगली इच्छा असुन काहीही उपयोग नाही तर त्या इच्छा पूर्ततेसाठी मी मनापासून, अगदी तन, मन, धनाने श्रम करणं अर्थात शंभर टक्के सहभागी होणं हे अत्यंत महत्वाचं आहे.

खरं तर इच्छा मनात निर्माण होते जी अदृष्य असते पणतिच्या पूर्ततेसाठी प्रयत्न करणं हे इच्छा मनात निर्माण होण्यापेक्षाही अत्यंत महत्वाचं आहे. 'दे रे हरि, बाजेवरी – ही वृत्ती, धारणा चुकीची आहे. हरि मनात म्हणणारंच एकदाच मिळणारं जीवन दिलंय, धडधाकट शरिर दिलंय, प्रसन्न मन दिलंय, घरातल्यांसह इतरांची सोबत स्वप्न पूर्ततेसाठी दिली आहे मग बाजेवरी कशाला बसतोस ? ऊठ. परिश्रम कर. मनापासून इच्छेचा आदर कर. रात्रंदिवस त्या इच्छेचा ध्यास घे. ध्यास हाच तुझा श्वास होऊ दे. तरच इच्छापूर्ती होईल.

दहावीचा निकाल लागल्यानंतर माझ्याशी परिचित असणारे दाम्पत्य त्यांच्या मुलाला घेऊन आले. मला, घरातल्यांना पेढे दिले. माझ्याकडे असणारं पुस्तक आणि पेन, मुलाला सस्नेह भेट दिला आणि आई, वडिलांचा शॉल देऊन सन्मान केला. वडिल म्हणाले अनेक घरांमध्ये आम्ही पेढे घेऊन गेलो. त्यांनी फक्त अभिनंदन म्हणत आमचं स्वागत केलं. मग तुम्ही एवढं सगळं कशासाठी केलंत? मी म्हणालो की माझी मनापासून इच्छा असते की कलाकार, खेळाडु, समाज कार्य करणारे अथवा दहावी, बारावी आणि स्पर्धा परिक्षेत चांगल्या गुणांनी यशस्वी होणारांचा सन्मान करायचा. गेली एकोणतीस वर्षे मी हे करतो आहे. मुलगा, माझ्या पाया पडला. मुलगा म्हणाला, 'हा तुमचा आदर्श मी नक्कीच घेईन कारण ह्यात स्वार्थ काहीच नाही. इतरांचा सन्मान व्हावा ही इच्छा असणं आणि त्यानुसार वागणं हे माझ्यासाठी आनंददायी, प्रेरणादायी आहे.

मुलाचे वडिल म्हणाले की आमच्या कुटुंबाकडुन उद्याच ह्याच्या मित्र, मैत्रिणींचा पुस्तक, पेन देऊन सन्मान करतो. मला मनापासून आनंद झाला. थोडक्यात असं म्हणता येईल की एखादी कृती, तुम्ही, तुमच्या इच्छा पूर्तीसाठी करता पण तिच कृती, दुसऱ्या एखाद्याची इच्छा होते. मी त्यांचे मनापासून आभार मानले.

म्हणालो, 'तुमच्या मुलाचा सन्मान बुके देऊनही करु शकलो असतो पण तीन दिवसांनंतर तो बुके फेकुन द्यावा लागला असता. हे पुस्तक वाचलं जाईल. तुम्ही त्या पुस्तकातील विचारांचा स्वीकार कराल. तुमचं भविष्य नक्कीच उज्वल होईल.' त्यांनी माझ्या घरी येण्यामागचा उद्देश सांगितला. त्या मुलाला आणि त्याच्या आई, वडिलांना, त्या मुलाच्या इच्छेपुर्ततेसाठी काय – काय करावं लागेल हे सविस्तरपणे सांगितलं. त्यांना ते मनापासून आवडलं. दाम्पत्याने, मुलाने माझे आभार मानले. फक्त स्वतःच्या इच्छा पुर्ततेसाठीच कर्म करणं योग्य नाही तर इतरांच्या अर्थात घरातले सदस्य, मित्र, मैत्रिणी, नातेवाईक, परिचित ह्यांच्या इच्छा पुर्ततेसाठी निस्वार्थपणे प्रयत्न करणं आपल्या हातात आहे. स्वतःसाठी जगतांना इतरांसाठीही जगायलाच पाहिजे, ही इच्छा असणं हेच 'माणूस' म्हणून आपलं आद्य कर्तव्य आहे.

हे 'माणूस' म्हणून आपण एकमेकांकडे पाहिले तरच शक्य आहे. काहीजण इतरांचं वाईट व्हावं अशी इच्छा ठेवतात त्यांची ती इच्छा नक्कीच पूर्ण होत नसणार. इतरांचं चांगलं करता नाही आलं तरी चालेल पण त्यांचं वाईट करण्याचा विचारही करु नये. काहींचं कर्म हे बऱ्याचदा जिथं काम करतो त्याच संस्थेला फसवण्याचं असतं. अशा व्यक्तींनी विचार करावाच कारण आपण ही कधीतरी ह्या अशा कर्मांमुळे फसणारंच आहोत हे त्यांनी लक्षात घ्यावं. आपला मनुष्यजन्मच मुळात चांगली कर्मं करण्यासाठी झाला आहे ही इच्छा मनापासून असेल तरच आपलं आणि इतरांचही भविष्य आपण उज्वल करण्यासाठीच कर्म करु शकतो. इच्छा खूप चांगली आहे आणि कर्म काहीच करणार नसाल तर अशा इच्छेला काहीच अर्थ नाही. चांगल्या सकारात्मक इच्छेन तसं कर्म करुया. तुमच्या इच्छापूर्तीसाठी मनापासून शुभेच्छा. वाचकांना चांगलं असं देण्याची माझी इच्छा 'साहित्य सहवास' च्या माध्यमातुन 'दे. नवामराठा' पूर्ण करत आहे. स्वतःची काळजी घ्या.

(लेख क्र.५६८)

**– सुनील राऊत** माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर मो.९८२२७५८३८३

# आरोग्य सखी

### आयुर्वेदीय आहार दृष्टीकोन

**३) गर्भाशयमुख बंद होणे :**

जर गर्भाशयाचे मुख अगदी सुईएवढे असेल किंवा फारच अरुंद असेल तर पाळीच्या वेळेस होणारा रजःस्राव बाहेर पडण्यास अडथळा निर्माण होतो. त्यामुळे गर्भाशयाच्या स्नायूंना रजःस्राव टाकण्यासाठी जास्त वेळा आकुंचन करावे लागते आणि वेदना जास्त होतात.

**४) हार्मोन्समध्ये असंतुलन असणे :**

इस्ट्रोजन आणि प्रोजेस्टेरोन या हार्मोन्सच्या संतुलनावर मासिक पाळी अवलंबून असते. गर्भाशयाचे अस्तर व्यवस्थित न सुटल्यामुळे गर्भाशयाच्या स्नायूंना जास्त जोरात आकुंचन करावे लागते व वेदना होतात.

**५) आंतर जननेंद्रियांना जंतुसंसर्ग होणे (Pelvic Inflammetory) :** गर्भाशय, बीजकोष, बीजवाहक नलिका यांना जंतुसंसर्ग झाल्यावर आंतरजननेंद्रियांना सूज येते व त्यामुळे कष्टार्तवाचा त्रास होतो.

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# प्रीकास्ट विरुद्ध कास्ट-इन-सिटू : भारताच्या बांधकाम क्षेत्राचे दोन मजबूत आधारस्तंभ

**मित्रांनो,**

आज भारत ज्या वेगाने बांधकाम करत आहे, तसा वेग कधीच पाहिला नसेल. प्रत्येक शहरात मेट्रो उभ्या राहतात आहेत, एक्सप्रेसवे प्रवासाचा वेळ कमी करत आहेत, स्मार्ट सिटीज उभारत आहेत, उंच उंच टॉवर्स आकाशाला भिडत आहेत, आणि प्रचंड डेटा सेंटर्स आपल्या डिजिटल जगाला शक्ती देत आहेत.

या सर्व वाढीच्या मागे दोन मजबूत पद्धती आहेत: पारंपरिक कास्ट-इन-सिटू

**आधुनिक प्रीकास्ट**

दोन्हीही महत्त्वाच्या, दोन्हीही मजबूत, आणि एकत्र मिळून भारताच्या बांधकाम क्षेत्राचं भविष्य घडवत आहेत.

**भारताचा बांधकाम बूम**

पूर्वी सगळं काही साइटवरच बांधलं जायचं. कामगार तेथेच काँक्रीट मिक्स करून, ओतून, क्युअर करून बांधकाम पूर्ण करायचे. हीच आहे कास्ट-इन-सिटू पद्धत. मजबूत आणि खात्रीशीर, पण थोडी संथ.

आज मात्र वेग महत्त्वाचा आहे. इथेच प्रीकास्ट येतो- रेडीमेड स्लॅब्स, बीम्स, वॉल्स, अगदी फूटिंग्स सुद्धा फॅक्टरीमध्ये तयार होतात, साइटवर नेले जातात, आणि क्रेनने बसवले जातात.

याला आपण असं म्हणू शकतो

**✻ कास्ट-इन-सिटू म्हणजे जुना योद्धा.**

**✻ प्रीकास्ट म्हणजे नवा धावपटू.**

**प्र. १ : कास्ट-इन-सिटू म्हणजे काय?**

काँक्रीट थेट साइटवर ओतलं जातं, क्युअर होतं आणि तिथेच सेट होतं.

**उदाहरण :** जसं घरी ताज्या पोळ्या करतो - थोडं वेळखाऊ, पण आपल्याला हवी तशी साईज-शेप मिळते.

**गुणधर्म :**

✻ लवचिक : कोणत्याही प्रकारचं डिझाइन शक्य.

✻ मोनोलिथिक : एकदम सलग, सांध्याविना रचना.

✻ खात्रीशीर : धरणं, टाक्या, स्कायस्क्रेपर्स यात वापर.

✻ ट्रान्सपोर्ट लागत नाही : सगळं साइटवरच बनतं.

**प्र. २ : प्रीकास्ट म्हणजे काय?**

काँक्रीटचे घटक आधी फॅक्टरीत तयार होतात, मग साइटवर बसवले जातात.

**उदाहरण :** रेडीमेड फर्निचर विकत घेतल्यासारखं - नीट, पटकन आणि वेळ वाचतो.

**प्रीकास्ट घटक :**

✻ स्लॅब्स (रेडीमेड फ्लोअर्स)

✻ बीम्स व कॉलम्स (स्तंभ)

✻ वॉल पॅनल्स

✻ जिने (स्टेअरकेसेस)

✻ फूटिंग्स (पाया सुद्धा प्रीकास्ट होऊ शकतात)

✻ मेट्रो गर्डर्स, डेकोरेटिव्ह फसाड्स, युटिलिटी डक्ट्स

**गुणधर्म :**

✻ ३०-५०% जलद.

✻ दर्जेदार, कमी क्रॅक्स.

✻ टिकाऊ.

✻ कर्व्हस, स्टायलिश फसाड्स शक्य.

✻ साइट स्वच्छ, सुरक्षित.

✻ फाऊंडेशनपासून छतापर्यंत सिस्टीम कव्हर.







**प्र. ३ : प्रीकास्टमध्ये हाय-ग्रेड काँक्रीट का वापरतात?**

प्रीकास्ट बांधकामात साधारणपणे M40-M60 ग्रेडचे काँक्रीट वापरले जाते, तर कास्ट- इन-सिटू (On-site) मध्ये M20-M30 ग्रेड पुरेसं असतं.

**मुख्य कारणं :**

१. जड लिफ्टिंगला तग धरणं

✻ प्रीकास्ट ब्लॉक्स तयार झाल्यावर त्यांना क्रेन व ट्रकच्या मदतीने हलवावं लागतं.

✻ या वेळी ब्लॉक्सवर मोठे stresses develop होतात.

✻ काँक्रीट कमजोर असेल तर ब्लॉक फेल होण्याची, क्रॅक येण्याची शक्यता जास्त असते.

✻ म्हणूनच हाय-ग्रेड काँक्रीट वापरलं जातं, जेणेकरून ब्लॉक्स सुरक्षितपणे व स्मूथली उचलता येतील.

**२. प्री- स्ट्रेसिंगची गरज**

प्रीकास्टमध्ये प्री-टेंशनिंग व पोस्ट-टेंशनिंग तंत्र वापरलं जातं:

✻ प्री-टेंशनिंग : स्टील वायर्स आधी स्ट्रेच करून मग काँक्रीट ओतलं जातं.

✻ पोस्ट-टेंशनिंग : काँक्रीट सेट झाल्यावर स्टील केबल्स घट्ट केल्या जातात. यामुळे लांब स्पॅन्स, पातळ स्लॅब्स आणि कमी क्रॅक्स मिळतात.

**३. लिफ्टिंगदरम्यान सुरक्षितता**

लिफ्टिंग करताना होणाऱ्या stresses absorb करण्यासाठी हाय-ग्रेड काँक्रीटची ताकद आवश्यक असते.

त्यामुळे ब्लॉक fail होण्याची शक्यता कमी होते आणि lifting process स्मूथ व सुरक्षित होते.

**प्र. ४ : भारतात प्रीकास्ट कंपन्या कमी का आहेत?**

जरी प्रीकास्टचे फायदे भरपूर असले तरी भारतात अजूनही कंपन्या कमी आहेत.

**मुख्य कारण :**

✻ मोठा सेटअप खर्च : जमिनीवर एकरभर जागा, भारी मशीनरी, मोल्ड्स, क्रेन्स, ट्रान्सपोर्ट ट्रक्स. शेकडो कोटींचं इन्व्हेस्टमेंट लागतं.

✻ ट्रान्सपोर्ट अडचणी : घटक खूप जड, हायवेवरून नेणं अवघड व खर्चिक.

✻ विशेष कौशल्य अनुभवी इंजिनियर्स, लिफ्टिंग टीम्स, ट्रेन्ड कामगार लागतात.

✻ प्रोजेक्ट साईज मोठ्या प्रोजेक्टमध्ये फायदेशीर, छोट्या प्रोजेक्टसाठी कास्ट-इन-सिटू सोपं व स्वस्त.

✻ भारताचा संथ अवलंब : युरोप, अमेरिका, चीनप्रमाणे मोठ्या प्रमाणात वापर नाही.

✻ रिस्क फॅक्टर : मोठं इन्व्हेस्टमेंट सतत परतावा देईल का याची भीती

**प्र. ५ : मेट्रो प्रोजेक्ट्समध्ये प्रीकास्टने वेळ कसा वाचवला ?**

मेट्रोसारख्या मोठ्या प्रोजेक्ट्समध्ये वेळ म्हणजे पैसा.

कास्ट-इन-सिटू पद्धत वापरली तर एका ब्रिज स्पॅनला ३-४ आठवडे लागत असत. म्हणजे काम हळू चालायचं.

पण प्रीकास्ट पद्धतीत काय केलं?

✻ आधीच यार्डमध्ये स्पॅन तयार केले.

✻ मग रात्रीच्या वेळी ट्रकने साइटवर आणले. आणि फक्त एका रात्रीत क्रेनने बसवले.

**दिल्ली मेट्रोचं उदाहरण बघा :**

✻ आधी : एका स्पॅनला ३-४ आठवडे.

✻ आता : एका रात्रीत इंस्टॉलेशन!

**याचा थेट परिणाम :**

✻ काम ३० - ४०% वेगवान झालं

✻ पब्लिकसाठी मेट्रो लवकर सुरु झाली

✻ तिकीट महसूल लवकर सुरू झाला

✻ आणि सर्वात महत्त्वाचं : प्रोजेक्टवरील कर्जावरील व्याज कमी झालं.

**प्र. ६ : बिल्डर्स हाउसिंगसाठी प्रीकास्टकडे का वळत आहेत? आजकाल बिल्डर्सवर खूप प्रेशर असतं :**

✻ खरेदीदारांना वेळेत घर हवं असतं. उशीर झाला की विश्वास कमी होतो.

✻ बँकेचं व्याज दररोज वाढत राहतं. प्रोजेक्ट उशीर झाला की खर्च दुप्पट होतो.

✻ गुंतवणूकदारांना पटकन परतावा हवा असतो.

अशा परिस्थितीत प्रीकास्ट बिल्डर्ससाठी वरदान ठरतं.

**प्रीकास्टचे फायदे :**

✻ टॉवर्स ६-१२ महिने लवकर पूर्ण होतात.

✻ खरेदीदारांना वेळेत घर मिळाल्याने विश्वास वाढतो.

✻ जास्त प्रोजेक्ट्स वेळेत पूर्ण झाल्याने टर्नओव्हर वाढतो.

✻ कमी वेळेत बांधकाम झाल्याने फायनान्सचा खर्च व बँक व्याज दोन्ही कमी.

**उदाहरण :**

✻ कास्ट-इन-सिटू पद्धतीत २२ मजली टॉवर पूर्ण करायला ३६ महिने लागतात.

✻ प्रीकास्टमध्ये तोच टॉवर फक्त २४ महिन्यांत.

म्हणजे १ वर्षाचा थेट फायदा!

**शहरांची उदाहरणं :**

✻ फक्त पुणे-मुंबई नाही, तर आता दिल्ली, बंगलोर, हैदराबाद, चेन्नई, अहमदाबाद, नागपूर, सुरत, इंदूर अशा शहरांमध्येही मोठे बिल्डर्स प्रीकास्ट वापरायला सुरुवात करत आहेत.

✻ कारण मोठ्या टाउनशिप्स, हाय-राइज टॉवर्स, डेटा सेंटर्स, आणि कमर्शियल कॉम्प्लेक्सेसमध्ये प्रीकास्ट खूपच फायदेशीर ठरतं.

**भविष्यकाळात बिल्डर्स आपल्या जाहिरातींमध्ये असं म्हणताना नक्की दिसतील :** डिलिव्हर्ड विथ प्रीकास्ट - तुमचं घर वेळेत, प्रत्येक वेळेस.

**प्र. ८ : पर्यावरणपूरक कोण?**

✻ प्रीकास्ट कमी धूळ, कमी पाणी, कमी वेस्ट, रीसायकल.

✻ कास्ट-इन-सिटू : जास्त पाणी व वेस्ट, पण अनेक प्रोजेक्टसाठी आवश्यक.

**९ : छोट्या प्रोजेक्टमध्ये प्रीकास्ट शक्य आहे का?**

हो, पण परिस्थितीनुसार.

**कुठे जमेल :**

**मर्यादा :**

✻ लहान घरे, शाळा, हॉस्टेल्स प्रीकास्ट स्लॅब्स, जिने, फूटिंग्स.

✻ बाऊंड्री वॉल्स, सेप्टिक टँक्स, मॅनहोल्स, कल्व्हर्ट्स आधीपासून वापरात.

✻ सिंगल घरासाठी ट्रान्सपोर्ट व उत्पादन खर्च जास्त पडतो.

✻ जास्त युनिट्स एकत्र बनवायचे असतील तर उत्तम.

**भारतामधील प्रीकास्टचं भविष्य**

**१. सरकारचा भर - हाउसिंग आणि इन्फ्रास्ट्रक्चर**

भारताचं हाउसिंग फॉर ऑल मिशन लाखो घरे कमी वेळेत पूर्ण करण्याचं उद्दिष्ट ठेवतं. इथे कास्ट-इन- सिटू आणि प्रीकास्ट दोन्ही वापरले जातील, पण मोठ्या प्रमाणावर जलद काम पूर्ण करण्यासाठी प्रीकास्ट हा एकमेव स्केलेबल मार्ग आहे.

✻ स्मार्ट सिटीजमध्ये प्रीकास्टचा वापर होतोय : रहिवासी ब्लॉक्स, सार्वजनिक इमारती, युटिलिटी डक्ट्स, ड्रेन्स, फूटपाथ्स, कल्व्हर्ट्स.

✻ चीन व सिंगापूरसारख्या देशांनी प्रीकास्टने संपूर्ण टाउनशिप्स उभारल्या. भारतही हळूहळू त्या दिशेने चाललाय.

**२. रिअल इस्टेट - मेट्रो सिटीजपासून नागरी भागापर्यंत**

आज मुंबई, पुणे, दिल्ली, बंगलोरसारख्या शहरांत प्रीकास्टने प्रोजेक्ट डिलिव्हरी महिन्यांनी जलद केली जाते.

✻ मुंबई : प्रोजेक्ट डिलिव्हरी लवकर, थेट कोट्यवधींची बचत.

✻ पुणे : टाउनशिप डेव्हलपर्स मोठ्या प्रमाणात वापरू लागले.

✻ लवकरच नागरी शहरांतही ही पद्धत लोकप्रिय होईल.

खरेदीदारांना वेळेत घर मिळणं

जास्त विश्वास.

भविष्यात बिल्डर्स आपल्या जाहिरातींमध्ये अभिमानाने म्हणतील:

Precast Homes

On Time, Every Time.

३. डेटा सेंटर्स व IT पार्क्स - डिजिटल इंडियाचा कणा

5G, AI, क्लाउड, OTT साठी पुढच्या दशकात शेकडो डेटा सेंटर्स लागतील. प्रीकास्टचा फायदा :

✻ हाय-स्ट्रेंथ, प्री-स्ट्रेस्ड स्लॅब्स.

✻ फायर सेफ कन्स्ट्रक्शन.

✻ फक्त ६-८ महिन्यांत इमारत तयार (जिथे कास्ट-इन-सिटूने १८ महिने लागत).

✻ प्रत्येक ३-६ महिने लवकर म्हणजे कंपन्यांना कोट्यवधींचं रेव्हेन्यू लवकर मिळतं.

**४. मजूर व कौशल्याची कमतरता**

✻ पारंपरिक कास्ट-इन-सिटूत मोठ्या प्रमाणावर मजुरांची गरज असते.

✻ पण आजकाल मजूर कमी मिळतात, पगार वाढले आहेत.

✻ प्रीकास्टमध्ये बहुतेक काम फॅक्टरीत होतं साइटवर फक्त क्रेन व इंस्टॉलेशन. त्यामुळे बिल्डर्सना प्रीकास्ट अधिक आकर्षक वाटतो.

**५. हरित व टिकाऊ बांधकाम**

प्रीकास्टमुळे. : कमी पाणी, कमी धूळ, कमी वेस्ट, रिसायकलिंग शक्य.

ग्रीन बिल्डिंग सर्टिफिकेशन्स (LEED, GRIHA) साठी प्रीकास्ट उत्तम बसतो.

**६. स्पेशलपासून मेनस्ट्रीमकडे**

आज प्रीकास्ट अजून स्पेशल पद्धत वाटते - मुख्यतः मेट्रो, ब्रिजेस, काही टॉवर्सपुरती. पण पुढील १०-१५ वर्षांत:

✻ डझनभर नवी प्रीकास्ट फॅक्टरीज सुरू होतील.

✻ बिल्डर्स हायब्रिड सिस्टीम्स वापरतील बेसमेंटसाठी व विशेष भागासाठी कास्ट-इन-सिटू, वरच्या स्ट्रक्चरसाठी प्रीकास्ट.

✻ खरेदीदार प्रीकास्टला वेळेत डिलिव्हरी + उत्तम क्वालिटी म्हणून पाहतील.

२५ वर्षांपूर्वी Ready-Mix Concrete (RMC) दुर्मिळ होतं, आज सर्वत्र आहे. प्रीकास्टलाही हाच प्रवास होईल.

**सारांश**

**कास्ट-इन-सिटू :** मजबूत पायाभूत कामं, बेसमेंट्स, जटिल स्ट्रक्चर्ससाठी आवश्यकच राहील.

**प्रीकास्ट :** मास हाउसिंग, टाउनशिप्स, डेटा सेंटर्स, टॉवर्स आणि जलद कामासाठी भविष्यातील इंजिन ठरेल.

**भविष्य संदेश :**

प्रीकास्ट म्हणजे फक्त टेक्नॉलॉजी नाही - ते भारताच्या वाढीचं इंजिन आहे. पण त्याच वेळी, कास्ट-इन-सिटू हीच पाया आहे, जी प्रीकास्टला पूरक ठरते.

आणि खरा प्रश्न हा नाही की कोण चांगलं?

तर हा आहे: कोणत्या प्रोजेक्टसाठी काय योग्य?

आणि दिवसेंदिवस, उत्तर एकच येतंय: प्रीकास्ट.



**Er. ओंकार म्हसे,** B.E. Civil
**JMR Buildcon**
Flat No. 7, **शिवतेज अपार्टमेंट, प्राइमव्हिजन हॉस्पिटलजवळ, गुलमोहर रोड, अहिल्यानगर**
८७८८४९९३८५
Web: www.jmrbuildcon.com
Email: jmrbuildcon@yahoo.com

AESA
Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar

# नवरात्रौत्सवातील भवानी जगदंबेची उपासना जीवन कृतार्थ करते

## हभप मिलिंद महाराज चवंडके यांचे प्रतिपादन



नगर - देवाधिदेव महादेवांसह सर्व देवांच्या मुखामधील तेजामधून प्रगट झालेली भवानी जगदंबा. हीच त्रैलोक्याची जननी अंबाबाई. नवरात्रौत्सवात या भवानी जगदंबेची केलेली उपासना जीवन कृतार्थ करते, असे प्रतिपादन हभप मिलिंद महाराज चवंडके यांनी केले.

येथील सनातन धर्मसभेने महाजनगल्लीतील गायत्री मंदिरात आयोजित केलेल्या शारदीय व्याख्यानमालेत 'आदिमातेचा जागर' या विषयावर ते बोलत होते. धर्मसभेचे उपाध्यक्ष हभप निळकंठ महाराज देशमुख यांनी स्वागत केले. वेदमूर्ती सोमनाथ मुळे यांनी मिलिंद महाराज चवंडके यांच्या हस्ते देवीची पंचोपचार पूजा केली. रमेश देशपांडे यांनी श्री.चवंडके यांचा परिचय करून दिला. दिनकर देशमुख यांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले.

हभप मिलिंद महाराज चवंडके पुढे म्हणाले, विश्व व्यापलेल्या जगदंबेच्या इच्छेनेच उत्पती-स्थिती-प्रलय घडतात. देवांच्या कार्यासाठी जगदंबा म्हणून प्रगटणाऱ्या आदिमातेची पंचमहाभूतांवर सत्ता आहे. ही देवी मायास्वरूप, बुध्दीरूप, चेतनारूप, निद्रारूप, क्षुधारूप, तृष्णारूप, छायारूप, शांतीरूप, शक्तिरूप, लज्जारूप, श्रध्दारूप, कांतीरूप, लक्ष्मीरूप, वृत्तीरूप, स्मृतिरूप, दयारूप, तुष्टीरूप, मातृरूप, भ्रांतीरूप, मोहरूप आहे. हीच देवी साधुगृही श्रध्दारूपात, कुलवंतांचे घरी लज्जारूपात तर पुण्यवंतांचे घरी लक्ष्मीरूपात रहाते. सर्व संकटांचा-दुःखांचा संहार करणारी, शत्रूंचा नाश करणारी, आत्मसुख मिळवून देणारी, भक्तांचे कल्याण करणारी विश्वाची स्वामिनी विश्वात्मिका, सकळ जगाची माता आपली कुलस्वामिनी आहे, ही श्रध्दा पिढ्यान् पिढ्या चालत आलेली घराणी भाग्यवंत आहेत. अशा घराण्यात जन्म घेतलेले आपण नवरात्रौत्सवात आदिमातेचा जागर करताना पिढीजात परंपरेचे निष्ठेने, श्रध्देने, विश्वासाने पालन करत जीवनाची कृतार्थता अनुभवतो.

अनादी काळापासून नवरात्रीची परंपरा चालत आली आहे. आपल्या देवघरातील कुलदेवतेतील देवत्व अधिक प्रभावी व्हावे, आपल्या घरात वंशवृध्दी होऊन घरावर कुलदेवीचे कृपाछत्र कायम असावे, अदृष्टशक्तींपासून आपल्या कुळाचे संरक्षण व्हावे, म्हणून नवरात्रौत्सवात देवीतत्वाला आवाहन करत साधना करावी.

महर्षी वेदव्यासांनी १८ महापुराणांची रचना केल्यावर १८ उपपुराणांची रचना केली. या उपपुराणांमध्ये देवीपुराण आहे. श्रीदेवीमाहात्म्य, सप्तशती, कालिकापुराण यामध्ये नवरात्र विधी सांगितला आहे. नवरात्र व्रताचे प्रकार, कुमारिका पूजन, नवरात्रौत्सवात कोणत्या दिवशी कोणती माळ घालावी? कोणता नैवेद्य दाखवावा? हे बारकाव्यांनिशी सांगताना देवी पुरणपोळीच्याच नैवेद्याचा स्विकार करते हे आवर्जून सांगत देवीच्या विविध स्तोत्रांचे पठण, हवन, देवीचा नामजप करण्याचे आवाहन हभप मिलिंद महाराज चवंडके यांनी केले.

कार्यक्रमास सर्वश्री समीर उधाध्ये, उमेश वाळुंजकर, बंडोपंत धर्माधिकारी, सर्वोत्तम क्षीरसागर, मुळे गुरूजी, एस.एम.कुलकर्णी, हेमंत देशमुख, सुनिल कात्रे, सोन्याबापू मुदळ, प्रविण सोनी, राजेंद्र भागानगरे, आनंद झारखंडे, सोनाली चवंडके, राणी खताडे, सुनिता काटकर, स्वाती गांधी, रूपाली दहिवाले, सोनाली खताडे, मोनिका भागानगरे, ज्योती भागानगरे, राणी भागानगरे यांच्यासह शहरातील आणि उपनगरातील भाविक उपस्थित होते.

# राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शहरात २८ सप्टेंबरला पथसंचलन व विजयादशमी उत्सवाचे आयोजन

नगर - राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्थापनेचे शताब्दी वर्ष साजरे करत आहे. या शताब्दी वर्षाची सुरुवात विजयादशमीच्या उत्सवाने करण्यात येणार आहे. यानिमित्त अहिल्यानगर शहरात २८ सप्टेंबर रोजी विविध ५ भागांमध्ये विजयादशमी उत्सव, पथसंचलन व शस्त्रपूजन करण्यात येणार आहे. २ ऑक्टोबर विजयादशमीला सकाळी ७ वाजता अहिल्यानगर शहरातील भिस्तबाग चौक पाईपलाईन रोड परिसरात पथसंचलन होणार आहे, अशी माहिती संघाचे अहिल्यानगर शहर कार्यवाह हिराकांत रामदासी यांनी दिली.

अहिल्यानगर शहरात २८ सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता महात्मा फुले नगरचे पथसंचलन मार्केटयार्ड परिसरातून होणार आहे. यावेळी सिताबन लॉन येथे होणाऱ्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे उद्योजक गौतम मुनोत व प्रमुख वाकते अहिल्यानगर दक्षिण जिल्हा सहकार्यवाह दिनेश करंडे उपस्थित राहणार आहेत. सावेडी गुलमोहर रोड परिसरातील श्रीरामनगर भागात दुपारी ३.३० वाजता पथसंचालन होणार आहे. यावेळी आम्रपाली मंगल कार्यालयात होणाऱ्या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे समर्थ शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता जोशी व प्रमुख वक्ते अहिल्यानगर दक्षिणचे जिल्हा प्रचारक दीपक पारेकर उपस्थित राहणार आहेत.

सायंकाळी ५ वाजता मध्यनगर भागातून पथसंचलन होणार असून नेप्ती नाका चौकातील मार्कंडेय संकुल येथे होणाऱ्या कार्यक्रमास प्रमुख वक्ते पुण्याचे ॲड. योगेश्वर घोगले, तर दलित महासंघाचे जिल्हाध्यक्ष संजय चांदणे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. शहरातील दिल्लीगेट भागातून सायंकाळी ५ वाजता पथसंचलन होणार असून नेप्ती नाका चौकातील मार्कंडेय संकुल येथे होणाऱ्या कार्यक्रमास प्रमुख वक्ते पुण्याचे ॲड. योगेश्वर घोगले व प्रमुख पाहुणे दलित महासंघाचे जिल्हाध्यक्ष संजय चांदणे उपस्थित राहणार आहेत.

दुपारी ४ वा. भिंगार भागातून पथसंचलन होणार असून पंपिंग स्टेशन जवळील भाग्यलक्ष्मी लॉन्स येथे होणाऱ्या कार्यक्रमास प्रमुख वक्ते संघाचे नाशिक विभागीय शारीरिक शिक्षण प्रमुख सुनील चव्हाण व प्रमुख पाहुणे सावता माळी ट्रस्टचे विश्वस्त राजेंद्र झोडके उपस्थित राहणार आहेत. तसेच बंधन लॉन येथे सायंकाळी ५ वाजता होणाऱ्या कार्यक्रम ास प्रमुख पाहुणे प्रवीण बजाज व प्रमुख वक्ते पश्चीम प्रांत समरसता संयोजन सचिन राऊत उपस्थित राहणर आहेत.

नगर शहरात ५ विविध भागांमध्ये होणाऱ्या पथसंचलन व उत्सवांमध्ये त्या त्या भागातील नागरिकांनी, स्वयंसेवकांनी संघाच्या गणवेशामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन अहिल्यानगर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जिल्हा संघचालक वाल्मीक कुलकर्णी यांनी केली आहे.

# श्री समर्थ रामदास स्वामी यांच्या पादुका संदर्भात नगरमध्ये २८ सप्टेंबर रोजी बैठक

नगर - श्री रामदासस्वामी संस्थान, सज्जनगड आयोजित श्री समर्थ पादुका प्रचार व प्रसार दौरा २०२५-२६ हा निश्चित झाला असून, १९ ते २८ जानेवारी २०२६ अहिल्यानगर येथे येणार असल्याची माहिती श्री समर्थ मंडळाचे अध्यक्ष सुरेश क्षीरसागर व सुनील रामदासी यांनी दिली. या संदर्भात चर्चा करण्यासाठी ऋग्वेद भवन, चितळे रोड येथे २८ सप्टेंबर रोजी बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे.

या बैठकी साठी समर्थांचे वंशज व सज्जनगडाचे विश्वस्थ भूषणस्वामी रामदासी व समर्थभक्त ह.भ.प. मंदारबुवा रामदासी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

या बैठकीसाठी आपल्या सारख्या समर्थ भक्तांनी उपस्थित रहावे, असे आवाहन श्री समर्थ मंडळ अहिल्यानगर यांच्या वतीने करण्यात आली.

# पंडित दीनदयाळ पतसंस्था व दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट आयोजित व्याख्यानमालेची नियोजन बैठक



पंडित दीनदयाळ पतसंस्था परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यानमाला संदर्भात नियोजन बैठकित बोलताना वसंत लोढा.

नगर - देशातील सामाजिक व राजकीय घडामोडींवर प्रकाश टाकणारी, भारतीय संस्कृतीचे संवर्धन करणारी, मनामनात राष्ट्रप्रेम जागवणारी, देश हितासाठी तसेच वेगवेगळ्या क्षेत्रातील विषयांवर मंथन करणारी अशी ही दीनदयाळ व्याख्यानमाला आहे. अहिल्यानगर शहरातील सांस्कृतिक चळवळ या व्याख्यानमालेच्या वतीने ९ वर्षापासून दीनदयाळ परिवार कार्य करीत आहे. मागील वर्षी दीनदयाळ परिवाराच्या व्याख्यानमालेस अहिल्यानगरवासियांचा प्रतिसाद मिळाला आहे. या व्याख्यानम ालाची नियोजन बैठक झाली आहे. या व्याख्यानमालेसाठी नगरकर रसिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक वसंत लोढा यांनी केले आहे.

पंडित दीनदयाळ पतसंस्था परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने व्याख्यानमाला संदर्भात नियोजन बैठक झाली. याप्रसंगी संस्थापक वसंत लोढा, दिनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्टचे अध्यक्ष धनंजय तागडे, कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल, उपाध्यक्ष अशोक कानडे, महासचिव बाळासाहेब भुजबळ, विश्वस्त अनुराग धूत, अनिरुद्ध देवचक्के, राहुल जामगावकर, विकास पाथरकर, संदेश लोढा, राजकुमार जोशी, उद्योजक केके शेट्टी, नरेंद्र श्रोत्री, सुनील रामदासी, सचिन पारखी, निलेश लोढा, अजित कृष्णन, शारदा होशींग, सुखदेव दरेकर, महावीर कांकरिया, शामराव वागस्कर, बाळासाहेब खताडे, निलेश चिपाडे, प्रकाश धाडगे, अनिल सबलोक, सोमनाथ चिंतामणी, उज्वला भांगे, बाबासाहेब साठे, मिलिंद कोलते, अनिल जोशी, किशोर गांधी, गोकुळ काळे, पीडी कुलकर्णी, साहेबराव विधाते, सागर शिंदे, संग्राम म्हस्के, ज्ञानदेव भांगे, अँड.सलीम रंगरेज, वैभव जोशी, पंकज जहागिरदार, निलेश लाटे, उमेश मुळे, उमेश मेरगु आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात धनंजय तागडे म्हणाले, अहिल्यानगर शहरामध्ये ९ वर्षांपासून पंडित दीनदयाळ पतसंस्था व पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्टच्या वतीने व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येत आहे. या व्याख्यानमालेच्या माध्यमातून समाजाचे मोठ्या प्रमाणात प्रबोधन होत आहे. तसेच शहरात सांस्कृतिक जोपासण्याचे कार्य या माध्यमातून होत आहे. या व्याख्यानमालेस नगरकर रसिकांनी प्रतिसाद दिला आहे.

या नियोजनाच्या बैठकीत पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान प्रतिष्ठान ट्रस्टचे सर्व पदाधिकारी व शहरातील विविध क्षेत्रातील उपस्थित होते. यावेळी सूत्रसंचालन मिलिंद गंधे यांनी केले. अनिरुद्ध देवचक्के यांनी आभार मानले.

# सुवर्ण महोत्सवानिमित्त सभासदांना ५१०० रुपयांच्या मुदत ठेव पावतीची भेट

## चेअरमन हस्तीमल मुनोत यांची माहिती; अहमदनगर मर्चंटस बँकेची ५३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा खेळीमेळीत



अहमदनगर मर्चंटस बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा केशर गुलाब मंगल कार्यालय येथे हस्तीमल मुनोत यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीत पार पडली.

नगर – सुवर्णमहोत्सवी वर्ष पूर्ण करणाऱ्या अहमदनगर मर्चंटस बँकेला रिझर्व्ह बँकेने शेड्युल्ड बँकेचा दर्जा दिला असून अहवाल सालात बँकेच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. या कामगिरीबद्दल नॅशनल फेडरेशन ऑफ अर्बन को ऑप.बँक्स क्रेडिट सोसायटी लिमिटेड, नवी दिल्ली यांच्याकडून बँकेस सन्मानित करण्यात आले आहे. सभासद, खातेदार, ठेवीदारांचा विश्वास आणि सर्व तत्कालीन व विद्यमान संचालक, अधिकारी, कर्मचारी यांच्या एकत्रित प्रयत्नाने बँक उंचीवर पोहोचली आहे. अनेक आव्हानांना सामोरे जात बँकेने उत्कृष्ट कारभाराची परंपरा जपली आहे. त्यामुळेच चालू आर्थिक वर्षात सभासदांना १५ टक्के लाभांश देण्याचा ठराव केला आहे. बँक लवकरच डिमॅट अकाउंट सुविधा उपलब्ध करून देणार आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त बँकेच्या सभासदांना ५१०० रुपयांची मुदत ठेव पावती देण्यात येणार आहे. यासंदर्भात सहकार आयुक्त व रिझर्व्ह बँकेकडून परवानगी मिळवण्यात येणार आहे, अशी माहिती अहमदनगर मर्चंटस् को.ऑप.बँकेंचे संस्थापक तथा विद्यमान चेअरमन हस्तीमल मुनोत यांनी दिली.

अहमदनगर मर्चंटस बँकेची ५३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा केशर गुलाब मंगल कार्यालय येथे हस्तीमल मुनोत यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीत पार पडली. यावेळी व्हा. चेअरमन अमित मुथा, संचालक आनंदराम मुनोत, अनिल पोखरणा, संजय बोरा, किशोर गांधी, सी.ए.आयपी अजय मुथा, सी.ए.मोहन बरमेचा, संजय चोपडा, किशोर मुनोत, कमलेश भंडारी, संजीव गांधी, सुभाष बायड, मिनाताई मुनोत, प्रमिलाताई बोरा, विजय कोथिंबीरे, सुभाष भांड, बोर्ड ऑफ मॅनेजमेंट सदस्य राजेश झंवर, पेमराज बोथरा, मुख्य कार्यकारी अधिकारी सुनिल पुराणिक, जॉइंट सीईओ नितीन भंडारी, कर्मचारी प्रतिनिधी जितेंद्र बोरा, प्रसाद गांधी आदींसह सभासद उपस्थित होते.

यावेळी बँकेचे बँकिंग अधिक सोपे, सुरक्षित आणि आधुनिक करण्यासाठी मर्चंटस बँकेच्या डिजिटल बँकिंग प्रणालीतील एक पुढचे पाऊल कॉर्पोरेट बँकिंगचा शुभारंभ हस्तीमल मुनोत यांच्या हस्ते झाला. याबद्दलची सविस्तर माहिती बँकेच्या आयटी कमिटीचे चेअरमन सी.ए.,आयपी अजय मुथा यांनी वार्षिक सभेत सादर केली. तसेच खातेदारांसाठी आता मोबाईल बँकिंगमधील पुढचे पाउल म्हणजे मोबाईल बँकिगमधून आरटीजीएस, एनईएफटी सेवा व बँक स्टेटमेंट टॅली अकाउंटींग सॉफ्टवेअरमध्ये इंटिग्रेशन या नवीन सुविधांचाही शुभारंभ करण्यात आला.

प्रारंभी मुख्य कार्यकारी अधिकारी सुनील पुराणिक यांनी अहवाल वाचन केले व विषय पत्रिकेवरील विषयांची माहिती दिली.

चेअरमन हस्तीमल मुनोत पुढे म्हणाले, सन २०२४–२५ या आर्थिक वर्षात बँकेला ३९ कोटी १४ लाखांचा ढोबळ नफा झालेला आहे. आवश्यक तरतुदी वजा करून निव्वळ नफा ७ कोटी २ लाख रुपये इतका मिळाला. कर्जावरील व्याजात बँकेने अहवाल वर्षात २६ कोटी ८६ लाख रुपये रिबेट दिला असून रिबेटच्या रकमेचे उत्पन्नाशी शेकडा प्रमाण २२.२२ टक्के इतके आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात रिबेट देऊनही बँकेस चांगला नफा झाला आहे. अनेक आव्हाने, स्पर्धेला सामोरे जात बँकेने व्यवसाय, अर्थकारणाला चालना देण्यासाठी बँकेने कायम विशेष प्रयत्न केले आहेत. ३१ मार्च २०२५ अखेर बँकेचे वसुल भागभांडवल १९ कोटी २२ लाख रुपये असून इतर निधी २७१ कोटी ८० लाख रुपये आह. संचालक मंडळाने मंजूर केलेल्या नफा वाटणी प्रमाणे बँकेचा राखीव निधी व इतर निधी २७६ कोटी ३ लाख रुपयांचा होईल. आर्थिक वर्षअखेर बँकेचा सीआरएआर १५.७३ टक्के आहे. एसएलआरमध्ये गुंतवणुक ३२७ कोटी ३० लाखांची आहे व मुदत ठेवी २५५ कोटी ३९ लाखांच्या आहेत. यावरुन बँक भक्कम आर्थिक पायावर उभी असल्याचे निदर्शनास येते. सध्या व्यापारी बँकांचा चेहरा बदलत आहे. त्यामुळे मर्चंटस बँक अत्याधुनिक डिजिटल बँकिंग सेवा उपलब्ध करून देत आहे. खातेदारांना त्यांचे पासबुक प्रिंट करून घेण्यासाठी पासबुक किऑस्क मशीनची सुविधा ६ शाखांमध्ये सुरू करण्यात आली आहे. तसेच येत्या काळात सर्वच शाखांमध्ये ही सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. ही सुविधा खातेदारांना २४ बाय ७ मिळेल. ज्या खातेदारांनी खात्यास स्वतःचे ईमेल आयडी रजिस्टर केले आहेत त्यांना दरमहा त्यांच्या ईमेलवर त्यांच्या खात्याचे ई स्टेटमेंट पाठवले जाते. ज्या ग्राहकांनी ईमेल व मोबाईल नंबर रजिस्टर केले नाहीत, त्यांनी नजीकच्या शाखेत जाऊन रजिस्ट्रेशन करावे. बँकेच्या दाळ मंडई, मार्केट यार्ड चव चितळे रोड शाखेत सध्या कॅश डिपॉझिट मशीन कार्यान्वित झाले आहे. सर्वांच्या सहकार्याने बँकेची प्रगतीची घोडदौड अशीच कायम राहिल असा विश्वास चेअरमन मुनोत यांनी व्यक्त केला.

यावेळी सभासद श्रीकांत मंडोरे यांनी उपस्थित केलेल्या विविध प्रश्नांना चेअरमन हस्तीमल मुनोत यांनी सविस्तर उत्तर दिले. विषय पत्रिकेवरील सर्व विषयांना एकमताने मंजूरी देण्यात आली. व्हाईस चेअरमन अमित मुथा यांनी आभार मानले.


मर्चंटस् बँकेला शेड्युल्ड दर्जा मिळाल्याबद्दल चेअरमन हस्तीमल मुनोत यांचा सत्कार करण्यात आला.

# मर्चंटस् बँकेला शेड्युल्ड दर्जा मिळाल्याबद्दल चेअरमन हस्तीमल मुनोत यांचा सत्कार

नगर – अहमदनगर मर्चंटस् बँकेला रिझर्व्ह बँकेकडून शेड्युल्ड बँकेचा दर्जा प्राप्त झाला आहे. याबद्दल माजी सभापती अविनाश घुले व माजी नगरसेवक विपुल शेटिया मित्र परिवारातर्फे बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बँकेचे संस्थापक तथा विद्यमान चेअरमन हस्तीमल मुनोत यांचा सत्कार करण्यात आला. तसेच सर्व संचालक मंडळाचा सन्मान करण्यात आला. यावेळी अजित बोरा, अ‍ॅड. सिद्धेश मेहेर, अभय गुजराती, हेमंत रासने, भरत पवार, सॅम खरात, अमोल पटवा, निलेश पोखरणा, सुनील गुगळे, किशोर श्रीश्रीमाळ, गिरीश पितळे, सचिन डूगंरवाल, अमोल डूगंरवाल, नरेश शहा, हिम्मत सिंघवी, नकुल चंदे, प्रशांत मुथा, निखिल शेटिया, अजित सिंघवी, प्रवीण कोठारी, पियुष लुंकड, आशिष देसरडा, योगेश चुत्तर, निखिल शेटिया, कमलेश पितळे, निलेश पटेल, कृष्णा पटेल, सचिन मुनोत, अमोल कटारिया, राहुल सोनीमंडलेचा, धनेश कोठरी, निकुंज छेडा, राजू पितळे, नवरतन डागा, किरण पितळे, अमोल पारख, मनोज वर्मा, विजय गांधी, महावीर गुगळे, संजय पिपाडा, वैभव गुगळे, रुपेश चोपडा, सुशिल भंडारी, मनिष लोढा, मनिष चोरडिया, राहुल भंडारी, प्रशांत श्रीश्रीमाळ, अनिकेत कौर, राजेश चंगेडिया, प्रतिक शिंगवी, सुनित शेटिया, रितेश चंगेडिया, करण शहा, भावेश चोरडिया, महावीर कटारिया, अभय बोरा, मनिष गुगळे, प्रतिक शिंगी, निखिल फिरोदिया, विराज गांधी, परितोष मुथा, अतुल शेटिया, प्रविण शिंगवी, विकी सुराणा, संदीप दुगड, अ‍ॅड. मोहित बोरा, प्रफुल्ल चोरडिया, गणेश चेन्नूर, सिध्दांत शेटिया, महेश छाजेड, हिंगणे सर, शैलेश बांठिया, किरण शिंगवी, जयेश पोखरणा, मनोज गुंदेचा, वसंत कोठारी, प्रशांत मुथा आदी सभासद, मित्र परिवार उपस्थित होता.

चेअरमन हस्तीमलज मुनोत म्हणाले, सर्व सहकारी संचालक, सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक, कर्मचारी यांच्यामुळे बँकेने कायम नवनवीन शिखरे पादाक्रांत केली आहे. सुवर्ण महोत्सवी वर्ष पूर्ण केल्यानंतर बँकेस शेड्युल्ड बँकेचा दर्जा प्राप्त झाला ही सर्वांसाठीच आनंदाची गोष्ट आहे. आज झालेला सन्मान माझ्या एकट्याचा नसून बँकेच्या प्रगतीत योगदान देणाऱ्या सर्वांचा सन्मान आहे. भविष्यातही बँक अशीच प्रगती करीत राहिल यादृष्टिने प्रयत्न राहतील. अविनाश घुले, विपुल शेटिया यांनी नगरसेवक म्हणून ठसा उमटविणारे काम केले आहे. सर्वसामान्यांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यास ते कायम तत्पर असतात. अशाच लोकप्रतिनिधीची समाजाला गरज असते.

व्हाईस चेअरमन अमित मुथा यांनी आभार मानले.

# नवरात्र उत्सवानिमित्त २८ सप्टेंबर रोजी नवदुर्गा सन्मान सोहळ्याचे आयोजन

## विविध क्षेत्रातील ९ कर्तृत्ववान महिलांचा होणार गौरव, मेळाव्यात आरोग्य विषयी मार्गदर्शन



नगर – स्व. पै. किसनराव डोंगरे बहुद्देशीय संस्था, श्री नवनाथ युवा मंडळ, धर्मवीर ग्रामीण सार्वजनिक वाचनालय व नगर तालुका तालिम सेवा संघ यांच्या संयुक्त विद्यमाने २८ सप्टेंबर रोजी निमगाव वाघा (ता. नगर) येथे नवरात्र उत्सवानिमित्त नवदुर्गा सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. विविध क्षेत्रातील ९ कर्तृत्ववान महिलांना पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. तसेच यावेळी महिला मेळावा होणार असून, पंचक्रोशीतील महिला उपस्थित राहणार आहेत.

परिवार मंगल कार्यालयात होणाऱ्या पुरस्कार वितरण सोहळ्याप्रसंगी भरोसा सेलच्या प्रभारी अधिकारी पोलीस उपनिरीक्षक प्रियंका आठरे, कोतवाली पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात व पोलीस उपनिरीक्षक शितल मुगडे उपस्थित राहणार असल्याची माहिती कार्यक्रमाचे संयोजक तथा डोंगरे संस्थेचे अध्यक्ष पै. नाना डोंगरे यांनी दिली.

सरपंच उज्वला कापसे (सामाजिक व राजकीय क्षेत्र), नगर पंचायत समितीचे कृषी व्यवस्थापक रोहिणी आगरकर (कृषी), सरोज आल्हाट (कवियत्री व साहित्यिक), डॉ. सौ. अस्मिता खिस्ती (वैद्यकिय), मुख्याध्यापिका संगीता फुलसौंदर (शिक्षण), सहकार क्षेत्रात वैशाली वर्पे (सहकार), महसूल सेवक सुनीता जाधव (शासकीय), सोनाली फलके (बचत गट), देवकी ढोकणे (शैक्षणिक), मंगल ठाणगे (बचत गट), पूर्वा ख्रिस्ती (शैक्षणिक) यांना पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत.

या कार्यक्रमात निंबळकचे प्रभाग समन्वयक संदीप वाबळे, एसबीएम विभागाचे संदीप तागडकर व आरोग्यावर डॉ. धनश्री ढुमणे मार्गदर्शन करणार आहेत. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी युवा मंडळाचे अध्यक्ष संदीप डोंगरे, सचिव प्रतिभा डोंगरे, डोंगरे संस्थेचे सचिव मंदाताई डोंगरे परिश्रम घेत आहे.

# स्पुक्टो संघटनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त २८ सप्टेंबर रोजी कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन



नगर – सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठीय आणि महाविद्यालयीन अध्यापक संघटना (स्पुक्टो) या संघटनेची स्थापना ६ जानेवारी १९७४ मध्ये झाली. संघटनेच्या स्थापनेला पन्नास वर्ष पूर्ण होवून संघटना एक्कानव्या वर्षात प्रवेश केला आहे. संघटनेच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील पुणे अहिल्यानगर व नाशिक या तीनही ठिकाणी सोहळ्याचे आयोजन करण्यात येत आहे.

स्पुक्टोच्या पन्नास वर्षांच्या कार्याचा प्रवास साजरा करत असताना या प्रवासाचे साक्षीदार असलेले संघटनेचे माजी पदाधिकारी यांचा सन्मान व्हावा या कृतज्ञभावनेने त्यांच्या कृतज्ञता सोहळ्याचे आयोजन २८ सप्टेंबर रोजी अहिल्यानगरमधील न्यू आर्ट्स कॉमर्स अ‍ॅण्ड सायन्स कॉलेज येथे केले आहे. यानिमित्ताने स्पुक्टोच्या स्थापनेपासूनच्या जिल्ह्यातील सर्व माजी पदाधिकारी यांचा यथोचित सन्मान करण्यात येणार आहे.

कृतज्ञता सोहळा या कार्यक्रमासाठी उद्घाटक म्हणून आमदार सत्यजित तांबे, विधान परिषद सदस्य, पदवीधर मतदारसंघ नाशिक विभाग, प्रमुख पाहुणे म्हणून माजी कुलगुरू डॉ. सर्जेराव निमसे, तर अहिल्यानगर जिल्ह्यात ज्यांनी संघटनेची मुहूर्तमेढ रोवली असे संघटनेचे संस्थापक सरचिटणीस आदरणीय प्राचार्य डॉ. खासेराव शितोळे हे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवित आहेत. या प्रसंगी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे अध्यक्ष डॉ. श्यामराव लवांडे, सुवर्णमहोत्सव संयोजन समितीचे अध्यक्ष डॉ. के. एल. गिरमकर, स्पुक्टोचे अध्यक्ष प्रा. प्रकाश वाळूज, सरचिटणीस डॉ. प्रवीण ताटे, देशमुख सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा. संदीप पालवे, अधिसभा सदस्य प्राचार्य बाळासाहेब सागडे व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

कृतज्ञता सोहळा कार्यक्रमाच्या निमित्ताने दुपारच्या सत्रात निवृत्ती वेतन योजना: काल आज आणि उद्या या विषयावर डॉ. सोमनाथ वाघमारे समन्वयक जुनी पेन्शन हक्क कृती समिती महाराष्ट्र राज्य यांचे मार्गदर्शन आयोजित केले आहे.

कार्यक्रमासाठी जिल्ह्यातील स्थानिक शाखा पदाधिकारी व सभासदांनी उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हा स्पुक्टोचे अध्यक्ष डॉ. बाबासाहेब पवार व सरचिटणीस डॉ. रघुनाथ नजन यांनी जिल्हा कार्यकारिणी यांचे वतीने केले आहे.

# भिंगार अर्बन को. ऑप. बँकेच्या सभासदांना डिव्हिडंड लाभांश वाटप

## सभासदांच्या हितासाठी पारदर्शक निर्णय हाच भिंगार बँकेच्या यशाचा पाया : आ.शिवाजीराव कर्डिले


भिंगार अर्बन बॅकेच्या सभासदांना डिव्हिडंड वाटप जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन आ.शिवाजीराव कर्डिले यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी साईदिप सह्याद्री हॉस्पिटलचे डॉ.एस.एस.दिपक, बॅकेचे चेअरमन अनिलराव झोडगे, व्हाईस चेअरमन किसनराव चौधरी, मुख्य कार्यकारी अधिकारी शशीकांत महाजन व सभासद, संचालक आदींसह ह.भ.प.अमित महाराज धाडगे, वसंत राठोड, उपस्थित होते.

नगर – भिंगार बँकेने नेहमीच व्यावसायिकांना, छोट्या–मोठ्या उद्योजकांना वेळोवेळी कर्जवाटप करून आर्थिक उभारी दिली आहे. आज अनेक बँका कर्जवाटप टाळतात; मात्र भिंगार बँकेने सभासदांच्या हिताला प्राधान्य देत विश्वासाने कर्जवाटप केले. सभासदांनीही योग्य वेळेत परतफेड केली, त्यामुळेच बँकेचे नाव जिल्ह्यात व राज्यात ठळकपणे टिकून आहे. बँकेचे सर्व निर्णय पारदर्शक पद्धतीने चेअरमन, व्हाईस चेअरमन व संचालकांच्या संगनमताने घेतले गेले, हीच या यशाची गुरुकिल्ली आहे, असे प्रतिपादन जिल्हा बँकेचे चेअरमन आ.शिवाजीराव कर्डिले यांनी केले.

भिंगार अर्बन को. ऑप. बॅकेच्या सभासदांना सन २०२४– २०२५ या आर्थिक वर्षाचा डिव्हिडंड लाभांश १५% जाहीर करण्यात आला आहे. आ.शिवाजीराव कर्डिले यांचे हस्ते बँकेचे भागधारकांना डिव्हिडंडचे वाटप करुन, डिव्हिडंड वाटपास सुरुवात करण्यात आली. यावेळी साईदिप सह्याद्री हॉस्पिटलचे डॉ.एस.एस.दिपक, बॅकेचे चेअरमन अनिलराव झोडगे, व्हाईस चेअरमन किसनराव चौधरी, संचालक राजेंद्र पतके, कैलासराव खरपुडे, विष्णु फुलसौंदर, महेश झोडगे, माधव गोंधळे, रुपेश भंडारी, कैलास रासकर, कैलास दळवी, एकनाथराव जाधव, नामदेवराव लंगोटे, तिलोतमाबाई करांडे, अनिता भुजबळ, मुख्य कार्यकारी अधिकारी शशीकांत महाजन व सभासद आदींसह ह.भ.प.अमित महाराज धाडगे, संदिप कर्डिले, वसंत राठोड, अभिजित झोडगे, प्रतिक चौधरी, अमित भुजबळ, ज्ञानेश्वर धोत्रे उपस्थित होते.

यावेळी डॉ.एस.एस दीपक म्हणाले की, भिंगार बँकेमुळे सभासदांना अनेक सुविधा उपलब्ध झाल्या आहेत. ठेवी ठेवताना किंवा कर्ज घेण्याच्या प्रक्रियेत कुठलीही अडचण वाटत नाही. बँकेने निर्माण केलेला विश्वास प्रशंसनीय आहे. व्यवसायासाठी अन्यत्र जाण्याची आवश्यकता राहत नाही, कारण बँकेच्या माध्यमातूनच अनेक योजना उपलब्ध आहेत. यामुळेच परिसरातील छोटे उद्योग आज मोठ्या प्रमाणात उभे राहून प्रगती साधत आहेत, असे ते म्हणाले.

याप्रसंगी चेअरमन अनिल झोडगे यांनी ज्या सभासदांची बॅकेत खाती आहेत त्याचा लाभांश त्यांचे खात्यामध्ये जमा करण्यात आला आहे. बॅक पुरवित असलेल्या आधुनिक बँकिंग सुविधांचा सभासदांनी व खातेदारांनी बँकेशी व्यवहार करुन लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

यावेळी उपाध्यक्ष किसनराव चौधरी यांनी ज्या सभासदांनी आपले खाते बँकेत उघडले नाही अशा सभासदांनी आपले खाते बँकेत उघडून घ्यावे म्हणजे डिव्हिडंड खात्यात वर्ग करणे सोयीचे होईल. त्याचप्रमाणे विविध शाखांमध्ये खाते असलेल्या खातेदारांनी आपला खाते नंबर व डिव्हिडंड खात्यात जमा करणेसाठीचा अर्ज आपल्या नजिकच्या शाखेत द्यावा असे आवाहन केले.

यावेळी ह.भ.प.अमित महाराज धाडगे यांची जिल्हा रुग्णालयाच्या आयुषमान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजना समितीवर निवड झाल्याबद्दल त्यांचा बँकेच्यावतीने सन्मान करण्यात आला. यावेळी प्रास्तविका मुख्या कार्यकारी अधिकारी शशिकांत महाजन यांनी केले व बँक राबवित असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी कार्यक्रमास बँकेचे सर्व संचालक मंडळ, खातेदार उपस्थित होते. कैलास रासकर यांनी आभार मानले. तसेच यावेळी आ.कर्डिले, डॉ.दिपक यांचा बँकेच्या वतीने सत्कार करण्यात आला.

## वसोळ्या मुलींसाठी २९ सप्टेंबरला महालक्ष्मी पूजन/अष्टमी पूजा

नगर – यंदाच्या वर्षी महालक्ष्मी पूजन/अष्टमी पूजा २९ सप्टेंबर रोजी गुलमोहर रोडवरील नवले सभागृह येथे होणार आहे. पूजेची वेळ सकाळी १० असून वसोळ्या मुलींनी नावनोंदणी करावी, त्यासाठी वर्गणी शुल्क आहे. सांयकाळी ८ नंतर दर्शनासाठी येता येईल. दर्शनासाठी येताना कोणीही काळे कपडे परिधान करू नये. नावनोंदणी व माहितीसाठी सौ. स्मिता फडके ९४२२८९१२६६ व सौ. शुभा गोरे ९४२३७८३२४७ यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सस्मित आधार चित्पावन मंडळ कार्यकारिणी यांच्या तर्फे करण्यात आले आहे.

# प्रा.निलेश म्हस्के यांना पी.एच.डी. पदवी प्रदान



नगर – विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फार्मसी (औषध निर्माण शास्त्र) महाविद्यालयाचे प्राध्यापक निलेश सुरेशराव म्हस्के यांना नुकतीच चेन्नई येथील वेल्स इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स टेक्नॉलॉजी अ‍ॅण्ड अ‍ॅडव्हान्स्ड स्टडीज या विद्यापीठाची न्यूरो डिसऑर्डरसाठी सतत रिलीज डोस फॉर्मची रचना आणि मूल्यांकन या विषयावर फार्मसी या क्षेत्रातील विद्यावाचस्पती (पी.एच.डी.) पदवी प्रदान करण्यात आली.या अभ्यासक्रमात त्यांना चेन्नई येथील वेल्स विद्यापीठाचे औषधनिर्माणशास्त्र विभागाचे डॉ. एस.सतेश कुमार यांचे मार्गदर्शन लाभले.

डॉ.निलेश म्हस्के यांच्या या विषयावरील रिसर्चचा अभ्यास करत असताना त्यांनी इंटरनॅशनल स्कोपस या जर्नल्समध्ये ३ पेपर प्रकाशने केले. तसेच इंडो इटालियन इंटरनॅशनल कॉन्फरन्समध्ये त्यांचे वरील विषयावरील एकुण ०१ पेपर्सचे सादरीकरण झालेले आहे.


अहिल्यानगर रेल्वे स्टेशनवर स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

# सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत अहिल्यानगर रेल्वे स्टेशनवर स्वच्छता अभियान

नगर – सेवा पंधरवडा उपक्रमांतर्गत अहिल्यानगर रेल्वे स्टेशनवर स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, सेवा पंधरवाडा जिल्हा संयोजक बाबासाहेब सानप यांच्या मार्गदर्शनाखाली रेल्वे बोर्ड आघाडीचे संयोजक अनिल सबलोक, जिल्हा सरचिटणीस अशोक गायकवाड, महेश नामदेव यांनी रेल्वे स्टेशनवर स्वच्छता मोहीम राबवली.

यावेळी बाळासाहेब गायकवाड, व्यापारी आघाडीचे अध्यक्ष महेश गुगळे, नीरज राठोड, संजय गायकवाड, हर्षल बोरा, प्रशांत डहाळे, रेल्वेचे मुख्य स्वास्थ निरीक्षक पंकज सातपुते, इन्स्पेक्टर शुभम थोरात, स्टेशन मॅनेजर सुधीर महाजन यांच्यासह प्रवासी व नागरिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# अहमदनगर होमिओपॅथीक मेडिकल कॉलेजमध्ये २९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबरपर्यंत त्वचा व केसांच्या समस्या या विकारावर तपासणी व उपचार शिबीर

नगर – अहमदनगर होमिओपॅथीक शिक्षण संस्थेचे अहमदनगर होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल सावेडी रोड, अहमदनगर येथे २९ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबरपर्यंत सकाळी ९.३० ते ५ या वेळेत त्वचा व केसांच्या समस्या या विकारावर मोफत तपासणी व उपचार शिबीराचे आयोजन केले असल्याची माहिती प्राचार्य व रुग्णालयीन अधिक्षक डॉ. सुनिल पवार यांनी दिली.

या शिबीरामध्ये त्वचा विकार (इसब, नायटा, सोरियासिस, पांढरे डाग, नागिन, पिंपल्स, वांग इ) केसांच्या समस्या (चाई पडणे, टक्कल पडणे, डोक्यात कोंडा होणे, केस गळणे, केस दुभांगणे, केस पांढरे होणे इ.) या आजारावर सखोल चिकित्सा करुन आजार बरा होईपर्यंत दर आठ दिवसाला मोफत होमिओपॅथिक औषधे दिली जातील.

सर्व रुग्णांची मोफत तपासणी व उपचार डॉ. सुनिल पवार, डॉ.सोले मिनल, डॉ. ढोणे शिल्पा, डॉ. शकिल सय्यद, डॉ. राजेंद थोरात, डॉ. मेधा पगारे, डॉ. स्नेहल सोलनकर हे करणार असुन आजार बरा होईपर्यत सर्वांना मोफत होमिओपॅथीक औषधे देण्यात येतील, तसेच गरजेनुसार ईसीजी, रक्त, लघवी व सोनोग्राफी व एक्स रे ची तपासणी करुन, या तपासण्यांवर ३० टक्के सवलत दिली जाईल.

गरजु व्यक्तींनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष डॉ. भुषण अनभुले, उपाध्यक्ष भुषण चंगेडे, खजिनदार डॉ. विलास बी सोनवणे, सचिव डॉ. डी. एस. पवार, सहसचिव लक्ष्मीनिवास सारडा, संचालक बोरा आर.एस, अभय मुथ्था, शिवाजी रणसिंग, डॉ. समीर होळकर, राजेंद्र मेहेत्रे, डॉ. ऋतुजा चव्हाण, कृष्णा क्षत्रिय तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल पवार व आर एम ओ. डॉ. स्नेहल सोलनकर यांनी केले आहे.




# व्यसनं टाळून कर्करोगाला आळा

ककरोग किवा कॅन्सर हा भयावह आजार. तो झाल्याचं निदान झालं की भल्याभल्यांच्या अंगातलं त्राण जातं. मात्र तो दूर ठेवणं आपल्याच हातात असतं. अलीकडे महिलांमध्येही धूम्रपानाची आणि मद्यपानाची क्रेझ निर्माण झाली आहे. महिलांनी पार्टीत दारू पिणं ही आता आश्चर्याची बाब उरलेली नाही. मात्र आरोग्याच्या दृष्टीनं हे धोकादायक ठरू शकतं. विशेषतः धूम्रपानामुळे कर्करोगाला आमंत्रण मिळतं. २५ ते ४० वयोगटातील लोकांमध्ये निव्वळ धूम्रपान आणि तंबाखू खाण्याच्या सवयीमुळे कर्करोग होण्याच्या प्रमाणात गेल्या पाच वर्षांमध्ये दुपटीनं वाढ झाल्याचं समोर आलं आहे. महिलांच्या कर्करोगाच्या प्रमाणातही मोठी वाढ झाली बाब आहे. पिअर प्रेशर कवा मोठं झाल्याची खूण म्हणून अगर व्यसन सोडवता येत नसल्यामुळे मुलं या व्यसनाच्या आ-हारी जाण्याच्या प्रमाणातही मोठी वाढ झाली आहे. तोंडातून रक्त येणं, मलावरोध, आवाजात बदल होणं, तोंडातून दुर्गंधी येणं आणि १५ दिवसांपेक्षा अधिक काळ ताप येणं कवा खोकला येणं ही कर्करोगाची लक्षणं आहेत. अशा वेळी तातडीनं डॉक्टरांकडे गेलं पाहिजे. सुरुवातीच्या टप्प्यातील कर्करोग बरा होऊ शकतो; परंतु नंतरच्या टप्प्यातील कर्करोग बरा होण्याची शक्यता पुसट होत जाते. सध्या तरी केमोथेरपी हाच यावरील प्रभावी उपचार आहे. मात्र त्याचे दुष्परिणाम असता-तच. परंतु तरीही खंबीर मानसिकतेच्या सहाय्यानं यातून बाहेर पडलेल्या लोकांची उदाहणंही आहेत. त्यामुळे मुळातच मद्यपान, धूम्रपान करू नये आणि अतिचता व तणाव टाळावेत असा सल्ला दिला जातो. धूम्रपान टाळलं तर कर्करोग होण्याची शक्यता आठपटीनं कमी होतं असं संशोधनही नुकतंच समोर आलं आहे. थोडीशी शंका आली तरी लगेच डॉक्टरांकडे जाणं आणि खचून न जाता परिस्थितीला सामोरं जाणं या गोष्टी केल्या तर कर्करोगही बरा होऊ शकतो.

व्याधी विचार



**सामना नकारात्मकतेचा**

काही माणसं समोर आली की आपल्याला चटकन त्यांना टाळण्याच्या युक्त्यांचा विचार करावंसं वाटतं. त्यामुळे जगात काहीच चांगलं नाही, जग विश्वासघातकी-वाईट लोकांनीच भरलेलं आहे अशी भावना मनात निर्माण होऊ लागते. परंतु नकारात्मकता हा एक मानसिक आजार आहे. प्रत्येकाविषयी, प्रत्येक घटनेविषयी भीती, अविश्वास कवा शंका यांमधून तो उद्भवतो. त्याची मुळं सहसा आलेल्या काही वाईट अनुभवांचा प्रभाव मनावरून पूर्णपणे पुसून टाकून मन पुन्हा प्रसन्न करण्यात आलेल्या अपयशात दडलेली असतात. आत्मविश्वासाचा अभाव असल्यामुळे इतरांनी आपल्यावर मारलेले शेरेच खरे धरल्यामुळे इतर लोकांविषयी मनात राग निर्माण झालेला असतो. परिणामी, प्रत्येक व्यक्तीचं वागणं, बोलणं या मानसिक रुग्णाला आपल्या विरोधात असल्यासारखं वाटतं. आपल्या बाबतीत काहीच चांगलं घडणार नाही असं वाटू लागतं. कधी तरी लागोपाठ आलेल्या अपयशाच्या अनुभवातून यापैकी काही लोक पूर्णपणे सावरू शकलेले नसतात. यासाठी अर्थातच समुपदेशन आणि मित्र आणि जवळच्या मंडळींनी त्यांचे गैरसमज दूर करण्यासाठी संवाद साधणं हे उपचार आहेत. पेला अर्धा भरलेला की अर्धा रिकामा हे नेहमीचं उदाहरण या व्यक्तीबाबत नेहमीच दिलं जातं. अशा रुग्णांचं मन शांत करण्यासाठी काही औषधं दिली जातात. मनातील विचार काढून आत्मविश्वास बळावला जावा यासाठी मानसोपचार केले जातात. ध्यानधारणा, योग, शांत, प्रसन्न वातावरणात राहणं, फिरणं, जिथे आपल्यावर टीका केली जाणार नाही अशा लोकांच्या सानिध्यात अधिक काळ राहणं हे यासंदर्भात उपाय ठरू शकतात. अपयशावर मात करण्यासाठी पुन्हा पुन्हा प्रयत्न करण्यास प्रवृत्त व्हावं यासाठी त्यांना सतत प्रेरणा देत राहण्याचाही उपचारांमध्ये समावेश होतो. एखादं किरकोळ यशही त्यांना पुन्हा आत्मविश्वास प्राप्त करून देण्यास पुरेसं ठरतं.


# दीर्घकाळ घसा खवखवतोय?

थंड पाणी प्यायल्यास घसा खवखवतो. काही आंबट पदार्थ जास्त प्रमाणात खाल्ले, तरी घसा खवखवतो. दररोज मोठ्याने बोलण्यामुळेही घसा खवखवतो. घसा खवखवणे हे सहसा सर्दी, अॅलर्जी किंवा हवामानातील बदलांमुळे होते. सतत वेदना आणि घसा खवखवण्यामागे गंभीर आजाराची लक्षणे असू शकतात.

दीर्घकाळ घसा खवखवणे हे सहसा टॉन्सिलिटिसमुळे होते. यामध्ये घशाचा मागचा भाग सुजतो. त्यामुळे संसर्ग होतो. यामुळे घशात वेदना, गिळण्यास त्रास, घसा खवखवणे आणि कधी कधी ताप येऊ शकतो. ही समस्या मुले आणि किशोरवयीन मुलांमध्ये अधिक दिसून येते. घशातील खवखव घरगुती उपायांनी बरी होते; परंतु जर तो एका आठवड्यापेक्षा जास्त काळ टिकला, ताप आला किंवा लिम्फ नोड्स फुगले तर उपचारांना उशीर करू नका.

**कर्करोग असण्याची शक्यता**

बहुतेक प्रकरणांमध्ये घशातील खवखव (घशाचा दाह) दहा दिवसांमध्ये बरी होते; परंतु कधी कधी ती अनेक आठवडे टिकू शकते. घशातील खवखव महिनोनमहिने टिकत राहिली, आणि आवाजात कर्कशपणा, गिळण्यास त्रास होणे, वजन कमी होणे किंवा घशात गाठ वाटणे यासारखी इतर लक्षणे दिसली तर ते घशाच्या किंवा स्वरयंत्राच्या कर्करोगाचे प्रारंभिक लक्षण असू शकते. अशा परिस्थितीत, ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घेणे खूप महत्त्वाचे आहे.



डॉ. कुंदन गायकवाड

**दीर्घकाळापर्यंत घशात खवखवण्याची कारणे**

घसा इतका काळ टिकण्याची अनेक कारणे असू शकतात. ते तुमच्या आसपासच्या वातावरणातील गोष्टींमुळे असू शकते, जसे की धूर किंवा तीव्र रसायने. किंवा ते अधिक गंभीर आरोग्य समस्येचे लक्षण असू शकते.



**क्रॉनिक अॅलर्जी** – परागकण, बुरशी आणि पाळीव प्राण्यांचा कोंडा यासारख्या गोष्टींमुळे होणारी अॅलर्जी.

**टॉन्सिलिटिस – अशी स्थिती ज्यामध्ये तुमचे टॉन्सिल संक्रमित होतात आणि सुजतात.**

धूम्रपान करणे किंवा दुसऱ्या व्यक्तीच्या धुराच्या संपर्कात येणे. धूर आणि रसायनांसारख्या विषारी पदार्थांच्या संपर्कात आल्यानेही दीर्घकाळ घसा खवखवू शकतो.

**(क्रॉनिक ॲसिड रिफ्लक्स)**– पोटातील आम्ल अन्ननलिकेत जाते आणि त्रास होतो. यामुळे घसा खवखवतो.

**लॅरिन्गो फॅरेंजियल रिफ्लक्स**– या प्रकारात पोटातील आम्ल घशात जाते आणि त्रास होतो

**लक्षणे आणि कारणे**

* गिळण्यास त्रास
* घसा अडकणे
* घशामध्ये वेदना किंवा खाज सुटणे
* मानेतील सुजलेल्या ग्रंथी
* कमकुवत किंवा थकलेला आवाज


**निदान कसे करावे ?**

* **जलद अँटीजेन शोध चाचणी:** ही चाचणी 'स्ट्रेप थ्रोट' सारख्या बॅक्टेरियाच्या संसर्गाची तपासणी करते.
* **घसा कल्चर:** तुम्हाला कोणता संसर्ग आहे का आणि तो कोणत्या प्रकारचा आहे हे शोधण्यासाठी (जसे की विषाणू, बॅक्टेरिया किंवा बुरशीजन्य).

# हाता-बोटात सुन्नपणा?

हस्तांदोलन करताना हातात पुरेशी ताकद जाणवत नाही? बोटांमध्ये सतत सुन्नपणा जाणव-तोय? हातातील वस्तू गळून पडतात? ही केवळ थकवा आल्याचे किंवा वय वाढल्याचे लक्षणे नाहीत, तर हे पाठीच्या कण्यामधील मज्जारज्जूवर (स्पायनल कॉर्ड) विविध कारणांमुळे येणाऱ्या दाबाचे (स्पायनल कॉर्ड कॉम्प्रेशन/मायलॉपथी) सुरुवातीचे लक्षण असू शकते. या लक्षणांकडे दुर्लक्ष केल्यास अडखळत चालणे, अंग सुन्न होणे अशा पुढील टप्प्यातील आजारांनादेखील निमंत्रण मिळू शकते.

'स्पायनल कॉर्ड कॉम्प्रेशन' म्हणजे मणक्याच्या आतून जाणाऱ्या मज्जारज्जूवर हाडे, चकती, गाठ किंवा इजा यामुळे येणारा दाब. हा दाब वाढला, की मज्जासंस्थेवर परिणाम होऊन हात-पाय अशक्त होणे, हालचाली मंदावणे आणि समन्वय कमी होणे अशी लक्षणे दिसू लागतात. तरुणपणी ही लक्षणे न जाणवता वय वाढताना जाणवतात. त्यामुळे रुग्णाला हा वाढत्या वयाचा परिणाम असल्याचा गैरसमज होतो व त्याकडे दुर्लक्ष होते; परंतु सुरुवातीच्या टप्प्यात याचे निदान झाल्यास ही स्थिती औषधोपचार, फिजिओथेरपी किंवा शस्त्रक्रियेद्वारे दूर करता येते.



**लक्षणे कोणती ?**

* हस्तांदोलन करताना हातात ताकद न वाटणे
* बोटं, तळहात सुन्न होणं किंवा मुंग्या येणे
* वारंवार वस्तू हातातून गळून पडणे
* चालण्यात किंवा पाय हलवताना अडचण

डॉ. योगेश पोटे


**संतुलन बिघडणे किंवा अंग जड होणे**

**काय कराल?**

हातांमध्ये अचानक अशक्तपणा येणे किंवा सतत सुन्नपणा जाणवणे, याकडे दुर्लक्षित करू नका. अशा वेळी 'एमआरआय'सारख्या तपासण्या करून मूळ कारण शोधणे आणि त्यावर त्वरित उपचार करणे अत्यावश्यक आहे. वेळीच योग्य उपचार केल्यास मज्जारज्जूवरील दाब कमी करता येतो आणि पुढील गुंतागुंत टाळता येते.

# उशिरा झोपल्याचा वाईट परिणाम

सोशल मीडिया, ऑफिसचे काम आणि अभ्यासाच्या जबाबदाऱ्यांमुळे झोपेचा वेळ सतत कमी होत चालला आहे. रात्री उशिरापर्यंत जागे राहणे आरोग्यासाठी खूप हानिकारक असू शकते. असे केल्याने थकवा तर वाढतोच; पण शरीरावर आणि मानसिक आरोग्यावरही गंभीर परिणाम होतो. रात्री पुरेशी झोप न घेतल्याने शरीर कमकुवत होते. यामुळे शरीर संसर्ग आणि विषाणूजन्य आजारांना बळी पडण्याची शक्यता वाढते. झोपेचा अभाव चयापचय मंदावतो आणि लठ्ठपणा वाढवणाऱ्या हार्मोन्सचे असंतुलन करतो. रात्री उशिरापर्यंत सतत जागे राहिल्याने हृदयरोगाचा धोका वाढतो. मोबाइल, लॅपटॉप किंवा टीव्हीच्या स्क्रीनवरून निघणारा निळा प्रकाश मेलाटोनिन हार्मोनवर परिणाम करतो. रात्री उशिरा जड आणि तेलकट अन्न खाल्ल्या-नेदेखील निद्रानाश होतो.



आरोग्य वार्ता


डॉ. अजिंक्य बोऱ्हाडे

**चांगली झोप येण्यासाठी काय करावे ?**

* **झोपेचे वेळापत्रक राखा:** दररोज एकाच वेळी झोपण्याची आणि उठण्याची सवय लावा.
* **झोपण्यापूर्वी स्क्रीन**–मुक्त वेळ ठेवा. झोपण्यापूर्वी किमान एक तास आधी मोबाईल आणि लॅपटॉपपासून दूर राहा.
* **विश्रांती तंत्रे:** ध्यान आणि हलका व्यायाम करून झोप सुधारा.
* **रात्री कॅफिन आणि जड जेवण टाळा:** रात्री कॉफी किंवा जड अन्न घेऊ नका. रात्री उशिरापर्यंत जागे राहत असाल, तर ती सवय बनवू नका. योग्य वेळी झोपणे केवळ थकवा दूर करण्यासाठीच नाही तर संपूर्ण शरीरासाठीदेखील महत्त्वाचे आहे. म्हणून तुमच्या झोपेच्या वेळेत सुधारणा करा आणि निरोगी जीवनशैली स्वीकारून शरीर आणि मन तंदुरुस्त ठेवा.

# स्मरणशक्तीवर प्रदूषणाचा परिणाम

देशातच नव्हे, तर जगभरात वायू प्रदूषण सतत वाढत आहे. अनेक ठिकाणी ते अत्यंत धोकादायक स्थितीत पोहोचले आहे. त्यामुळे जवळजवळ प्रत्येक वयोगटातील लोकांना त्रास होत आहे. प्रदूषणाचा मनावरही परिणाम होत आहे. प्रदूषणामुळे शरीरा-तील स्मृतिभ्रंशाचा धोका वाढत आहे. या आजारात लोकांची स्मरणशक्ती कमकुवत होते. मेंदूच्या आरोग्यासाठी स्वच्छ हवा महत्त्वाची आहे, त्यामुळे हा आजार टाळता येतो.



एका संशोधनात दिसून आले आहे की वायू प्रदूषण, विशेषतः एम २.५ कण, लेवी बॉडी डिमेंशिया होण्याचा धोका वाढवू शकतात. हे प्रदूषण मेंदूमध्ये प्रथिनांचे संचय वाढवते. त्यामुळे मज्जातंतू पेशींना नुकसान होते. यामुळे लोक जुन्या आठवणी विसरायला लागतात. संशोधनातून दिसून आले आहे, की प्रदूषणाचे एम २.५ कण खूप लहान असतात. हे सूक्ष्म कण इतके लहान असतात, की शरीराच्या संरक्षण प्रणाली ओलांडून रक्तप्रवाहात प्रवेश करू शकतात आणि मेंदूपर्यंत पोहोचू शकतात. प्रदूषण केवळ नाकापुरते मर्यादित नाही तर न्यूरॉन्सपर्यंतदेखील पोहोचू शकते. हे कण मेंदूमध्ये पसरताना मज्जातंतू पेशी नष्ट करतात. हवेत असलेल्या कणांच्या संपर्कात आल्याने मेंदूमध्ये असलेली प्रथिने गुठळ्यांमध्ये बदलतात. ती नैराश्याची लक्षणे आहेत. हा अल्झायमरनंतर डिमेंशियाचा दुसरा सर्वात सामान्य प्रकार आहे. हा आजार शहरांमध्ये राहणाऱ्या लोकांना जास्त प्रभावित करतो. शहरांत वाहनांमधून निघणारा धूर आणि विषारी कण त्यांचे अधिक नुकसान करतात.

नवसंशोधन

डॉ. मेघा दळे


**मेंदूवर कसा परिणाम?**

लेव्ही बॉडीज म्हणजे मेंदूमध्ये जमा होणारे असामान्य प्रथिनांचे समूह. ते अल्फा-सिन्युक्लिन नावाच्या प्रथिनापासून बनलेले असतात. हे प्रथिन मेंदूच्या निरोगी कार्यासाठी आवश्यक आहे; परंतु ते अनेक प्रकारे चुकीच्या पद्धतीने दुमडून विविध हानिकारक लेव्ही बॉडीज तयार करू शकते. हे तंत्रिका पेशी नष्ट करू शकतात आणि मेंदूमध्ये पसरून विनाशकारी रोगांना कारणीभूत ठरू शकतात. शास्त्रज्ञांच्या मतानुसार वायू प्रदूषणाचा सामना केल्याने आरोग्य, सामाजिक, हवामान आणि आर्थिक दृष्टिकोनातून दीर्घकालीन फायदे मिळू शकतात. हवा सुधारल्यानंतरच परिस्थिती सुधारेल. यासाठी सर्वांना काम करावे लागेल.

# रक्तातील साखरेवर नियंत्रण कसे ठेवाल?

अनेक दीर्घकालीन आजारांपैकी सर्वात सामान्य आजार म्हणजे मधुमेह. रक्तातील साखर वाढायला लागली, की ती नियंत्रणात ठेवणे खूप गरजेचे असते. योग्य ते औषधोपचार नियमितपणे घेतले, तरी तेवढेच पुरेसे नसते. दैनंदिन जी-वनात शिस्त असणे, सकस आहार घेणे, साखरविरहित आहार घेणे आणि रोज थोडा तरी व्यायाम करणे गरजेचे आहे. याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे अधूनमधून रक्तातील साखरेचे प्रमाण तपासणे. यामुळे रक्तातील साखरेवर नियंत्रण ठेवता येते.

साखर खूपच वाढली, म्हणजेच ३७० किंवा त्याहून जास्त असणे आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक असते. अशा वेळी होणारा त्रास दुर्लक्षित करू नये. रक्तातील साखर एवढी वाढली, तर शरीरात केटोन नावाचा विषारी घटक तयार होऊ शकतो. त्यामुळे अचानक चक्कर येणे, उलट्या होणे, अस्वस्थ वाटणे, श्वास घेण्यास त्रास होणे आदी प्रकारचा त्रास होतो. परिणामी मधुमेह असणाऱ्यांनी शरीरातील साखर वाढवणाऱ्या बाबींची विशेष काळजी घेतली पाहिजे.



रक्तातील साखरेचे प्रमाण २५० पेक्षा जास्त असेल, तर ते चिंतेचे लक्षण आहे. साखरेची पातळी ३०० च्या पुढे गेल्यास तब्येतीवर मोठा धोका निर्माण होऊ शकतो. अशा वेळी स्ट्रोक (मेंदूत रक्तपुरवठा अचानक बंद होणे) किंवा डायबेटिक केटोअसिडोसिस नावाची गंभीर अवस्था निर्माण होऊ शकते.

आरोग्यवेध

डॉ. दिलीप शिरसाट

**जादा साखरेचे शरिरावर होणारे परिणाम**

* डोळे: दृष्टिदोष किंवा अंधत्व
* मूत्रपिंड: काम करण्याची क्षमता हळूहळू कमी होते
* हृदय: लवकर अटॅक येण्याची शक्यता
* रक्तवाहिन्या: संपूर्ण शरीरात नुकसान

साखर वाढण्याची कारणे

* जास्त तणाव
* औषधं वेळेवर न घेणं
* शरीरात इन्फेक्शन
* चुकीचं खाणं
* जीवनशैलीतील असंतुलन

काय कराल?

* भरपूर पाणी प्या. त्यामुळे साखर बाहेर टाकायला मदत होते
* केटोन टेस्ट करा
* केटोन सापडल्यास तातडीने डॉक्टरांशी संपर्क साधा
* इन्सुलिन घेत असाल, तर डॉक्टरांनी दिलेली आपत्कालीन योजना पाळा
* साखर असलेले पेय टाळा, पण शरीरात पाणी कमी होऊ देऊ नका


**या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका...**

* रक्तात ३७० / पेक्षा जास्त साखर असूनही कमी न होणं
* फार तहान लागणं
* वारंवार लघवी होणं
* दृष्टिदोष

डोळ्यांचं आरोग्य

## लक्षणं मोतीबदूची

मोतीबदू हा सर्रास आढळणारा नेत्रविकार आहे. मोतीबदूची काही लक्षणं पहायला मिळतात. सकाळी उठून खिडकीबाहेर बघितल्यावर धुरकट दिसत असेल तर तुम्हाला मोतीबदू आहे, असं समजायला हरकत नाही. मोतीबदू झाल्यानंतर तुम्हाला अंधुक, धुरकट दिसू लागतं. यामुळे वाचताना, गाडी चालवताना, चेहऱ्यावरचे भाव वाचताना अडचणी निर्माण होतात. त्यातही रात्रीच्या वेळी हा त्रास अधिक वाढतो. त्यामुळे अंधुक दिसत असेल तर तातडीने डोळ्यांची तपासणी करून घ्या.



जपणूक त्वचेची

## रात्री धुवा चेहरा

त्वचेची नियमित काळजी घेतल्यामुळे त्वचाविकारांना आळा घालता येतो. दररोज रात्री झोपण्याआधी चेहरा स्वच्छ धुणं गरजेचं आहे. दिवसभराच्या धामधुमीत चेहऱ्यावर बरीच धूळ, घाण बसते. प्रदूषित कणांमुळे त्वचेची बरीच हानी होते. म्हणूनच ही सगळी अस्वच्छता दूर करण्यासाठी दररोज रात्री झोपण्याआधी चेहरा धुवायला हवा. धूळ, प्रदूषित कणांमुळे त्वचेची रोमछिद्रं बंद होतात. रात्री चेहरा धुतल्यानंतर ही रोमछिद्रं खुली होऊन त्वचा मोकळा श्वास घेऊ शकते. बंद झालेली रोमछिद्रं, चेहऱ्यावर साठलेली घाण यामुळे पपल्स होतात. हा त्रास कमी करण्यासाठी रात्री चेहरा धुवायला हवा.



आजीबाईचा बटवा

## लाभ मूगडाळीचे

डाळींचं महत्त्व आपण जाणतोच. त्यातही मूगडाळ खूप लाभदायी आहे. मूगडाळीच्या सेवनाने बरेच आजार दूर होतात. वजन कमी करण्यापासून उच्च रक्तदाब नियंत्रित ठेवण्यापर्यंत बऱ्याच बाबी मूगडाळीच्या सेवनाने साध्य होऊ शकतात. मूगडाळ हलकी असल्यामुळे पटकन पचते. यामुळे पोटाशी संबंधित तक्रारी दूर होतात. मूगडाळीत पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि फायबरसारखे पोषक घटक असतात. पोटॅशियममुळे उच्च रक्तदाब नियंत्रणात राहू शकतो. यातल्या विरघळणाऱ्या फायबरमुळे पोटाच्या तक्रारी दूर होऊ शकतात. मूगडाळीमुळे चयापचय क्रिया सुधारते तसंच रोगप्रतिकारकशक्तीही वाढते. त्यामुळे मूगडाळीचं सेवन नियमितपणे करायला हवं.



# पर्यटकांना वास्तववादी माहिती देणे गाईडचे कर्तव्य

### प्रा. विश्वनाथ लाहोटी यांचे प्रतिपादन; टूर गाईड प्रमाणपत्रांचे वाटप



स्कील इंडिया उपक्रमाअंतर्गत असणाऱ्या टूरिझम हॉस्पिटॅलिटी स्कील कौन्सिलच्या अधिकृत टूर गाईडचा कोर्स पूर्ण करणाऱ्या गिर्यारोहकांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

नगर – निसर्ग ही आपली माता आहे. निसर्ग आपल्याला भरभरून देत असतो. पर्यटन करताना निसर्ग संवर्धन करणे प्रत्येकाची जबाबदारी आहे. पर्यटकांसाठी गाईडची भूमिका कमालीची महत्त्वाची असते. या वाटाड्यांनी पर्यटकांना वास्तववादी माहिती देऊन त्यांच्या ज्ञानात भर टाकावी. हे करत असताना पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही, याची काळची घ्यावी, असे प्रतिपादन प्रा. विश्वनाथ लाहोटी यांनीं केले.

स्कील इंडिया उपक्रमा–अंतर्गत असणाऱ्या टूरिझम हॉस्पिटॅलिटी स्कील कौन्सिलच्या अधिकृत टूर गाईडचा कोर्स पूर्ण करणाऱ्या गिर्यारोहकांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. त्या वेळी प्रा. लाहोटी बोलत होते. या वेळी उद्योजक गौरव फिरोदिया, ट्रेककॅम्प संस्थेचे विशाल लाहोटी आदी उपस्थित होते.

ट्रेकॅम्प संस्थेच्या पुढाकारातून केंद्र सरकारच्या पर्यटन विभागामार्फत टूर गाईडचा कोर्स नगरमध्ये आयोजित करण्यात आला होता. त्यात सुमारे ४० विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी ३३ जणांनी हा कोर्स यशस्वीरित्या पूर्ण केला. या मुळे नगरमध्ये पर्यटन मार्गदर्शकांची संख्या वाढली आहे. ट्रेकॅम्पकडे आता सर्टिफाईड माउंटेनीअर्ससोबतच सर्टिफाईड टूर गाईडही उपलब्ध झाले आहेत.

प्रा. विश्वनाथ लाहोटी पुढे म्हणाले की, गाईडना मिळालेले हे केवळ प्रमाणपत्र नसून एक नवी जबाबदारी आहे. पर्यटनप्रेमींसाठी अधिक माहितीपूर्ण प्रवास घडवणे, इतिहास, संस्कृती व निसर्गाशी असलेलं नातं अधिक जवळून अनुभवता येईल असा अनुभव देणे, प्रत्येक पर्यटकाला सुरक्षित, सुंदर आणि आठवणींनी भरलेला टूर देणे यासाठी गाईडने बांधील राहिले पाहिजे.

पर्यटन क्षेत्रातील कार्य अधिक सक्षमपणे व व्यावसायिकतेने पार पाडण्यास आता आम्ही सज्ज झालो आहोत. पर्यटनप्रेमी, निसर्गप्रेमी आणि इतिहासप्रेमी पर्यटकांना अधिक चांगल्या पद्धतीने मार्गदर्शन करू, अशी भावना या वेळी नव्याने गाईड झालेल्या गिर्यारोहकांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करिश्मा कोठारी यांनी केले. विशाल लाहोटी यांनी आभार मानले.



सावेडी उपनगरात गुलमोहर रोडवरील श्री स्वामी समर्थ मंदिरात नवरात्र उत्सवानिमित्त सामूहिक कुंकुमार्चन कार्यक्रमात महिलांनी सहभाग नोंदविला. श्री देवरे गुरुजी यांनी मार्गदर्शन केले. (छाया – विजय मते)

# श्री स्वामी समर्थ मंदिरात कुंकुमार्चन कार्यक्रम

नगर – कुंकुमार्चन हे एक धार्मिक कृत्य आहे. यामध्ये देवीच्या मूर्तीवर किंवा श्री यंत्रावर कुंकू वाहून तिची पूजा केली जाते हे कुंकुमार्चन नवरात्र, अष्टमी, नवमी किंवा लक्ष्मीपूजना सारख्या प्रसंगी केले जाते. यामुळे देवीची कृपा प्राप्त होते. कुंकवात शक्तीतत्त्व आकर्षित करण्याची क्षमता असल्याने घरात सकारात्मक ऊर्जा वाढते, असे निखिल देवरे गुरुजी यांनी कुंकुमार्चन कार्यक्रमप्रसंगी पौरोहित्य करताना सांगितले.

सावेडी उपनगरात गुलमोहर रोडवरील प्रति अक्कलकोट असलेल्या श्री स्वामी समर्थ मंदिरात नवरात्र उत्सव निमित्त कुंकुमार्चन कार्यक्रम झाला. यामध्ये भजनी मंडळ, परिसरातील भाविक, महिलांनी सहभाग नोंदविला. यावेळी सामूहिक कार्यक्रमात श्री देवरे गुरुजी यांनी कुंकुमार्चन चे महत्व विशद केले. कुंकुमार्चन हे देवी प्रसन्न करण्यासाठी तिची कृपा प्राप्त करण्यासाठी महिला हे करीत असतात. कुंकू हे सौभाग्याचे प्रतीक मानले जाते. या कुंकुमार्चना मुळे स्त्रियांचे सौभाग्य वाढते, पुण्य मिळते त्यामुळे नवरात्र उत्सवात या कुंकूमार्चन ला महत्त्व असते.



नवरात्रौत्सवानिमित्त बालक मंदिर महिला मंडळ दिल्ली गेटच्या वतीने आयोजित कार्यक्रमात महिलांनी हिरव्या रंगाच्या साड्या परिधान करून आपल्या संस्कृतीचे दर्शन घडविले.

# हिंदू धर्मातील सर्वोच्च आणि पवित्र असलेल्या आदी कैलास, मोठा कैलास आणि ॐ पर्वत यात्रेचे आयोजन

नगर – हिंदू धर्मातील सर्वोच्य आणि पवित्र असलेल्या आदी कैलास, मोठा कैलास आणि ॐ पर्वत यात्रेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती नंदकुमार पोळ यांनी दिली. सदर यात्रा २५ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर पर्यंत आहे.

आदी कैलास हे भगवान शंकराचे निवासस्थान आहे. त्याला फार धार्मिक महत्व आहे. ही यात्रा फार पुरातन आहे. पांडवांनी सुद्धा पापक्षालना साठी यात्रा केली होती. आदी कैलास समुद्र सपाटीपासून १८००० फूट उंचीवर आहे. आता भारत सरकारने या परिसरात संपूर्ण रस्त्यांचे जाळे उभारले आहे. त्यामुळे ही यात्रा पूर्ण वाहनाने होते. कुठेही चालावे लागत नाही. भारतातील भगवान शंकरांची पहिलीच तीर्थ यात्रा आहे, जिथे चालावे लागत नाही त्याचबरोबर या यात्रेत मोठा कैलासाच्या दर्शनाची सोय केली आहे. मोठा कैलास तिबेट मध्ये असल्याने चीन सरकारने या यात्रेवर बंधने आणल्यामुळे आता भारतातून च एक व्ह्यू पॉईंट केल्याने मोठ्या कैलासा चे सुद्धा लांबून पण भारतातून दर्शन या यात्रेत होणार आहे.

कुठलाही पासपोर्ट विजा लागणार नाही. त्याच बरोबर ॐ आकारच्या पर्वताचे या यात्रेत दर्शन होणार आहे. या यात्रेत जगप्रसिद्ध नीम करोली बाबा, गोलू देवमंदिर, पाताळ भुवनेश्वर, जागेश्वर धाम, महर्षी व्यास गुफा, मुळ काली माता या मंदिराचे सुद्धा दर्शन होणार आहे. पूर्ण यात्रा अहिल्यानगर ते अहिल्यानगर आहे.

ज्यांना या यात्रेला सहभागी व्हायचे असेल, त्यांनी अभिजीत पोळ मो. नं. ९४२२२२७९०६ आणि नंदकुमार पोळ मो. नं. ७८७५५०००५६ पुष्पम टूर्स ऍण्ड ट्रॅव्हल्स, अहिल्यानगर यांच्याशी संपर्क साधावा.

# सोमनाथ कळसकर, डॉ. विमलताई ढेरे, संजय चव्हाण, राजेंद्र उदागे, युवराज गुंड यांना 'मराठा भूषण' पुरस्कार

### ३० सप्टेंबर रोजी वितरण



नगर – अहिल्यानगर मराठा सेवा संघ व अहिल्यानगर मराठा नागरी पतसंस्थेच्या वतीने यावर्षी राष्ट्रपती पदक विजेते सेवानिवृत्त शिक्षक संगमनेर येथील ज्येष्ठ समाजसेवक सोमनाथ कळसकर, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष व कर्जत येथील ज्येष्ठ समाजसेविका डॉ. विमलताई ढेरे यांना मराठा समाज भूषण जीवन गौरव पुरस्कार जाहीर झाला असून याचे वितरण ३० सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता कोहिनूर मंगल कार्यालय येथे होणार असल्याची माहिती पतसंस्थेचे विद्यमान अध्यक्ष इंजिनिअर विजयकुमार ठुबे व मराठा सेवा संघाचे अध्यक्ष इंजिनियर सुरेशराव इथापे यांनी दिली.

अहिल्यानगर मराठा सेवा संघ व मराठा नागरी पतसंस्थेच्या वतीने दरवर्षी मराठा समाजामध्ये उल्लेखनीय कार्य केलेल्या महानिय व्यक्तीचा मराठा समाज भूषण पुरस्कार देऊन गौरव करण्यात येतो. यावर्षी मराठा समाज भूषण जीवन गौरव पुरस्कार संगमनेर येथील राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक व ज्येष्ठ समाजसेवक सोमनाथ कळसकर गुरुजी, जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्ष व महिला आणि सामाजिक कार्यात कर्जत येथे कार्यरत असलेल्या डॉक्टर विमलताई ढेरे यांना देण्यात येणार आहे. तसेच यावर्षीचा युवा उद्योजक पुरस्कार उद्योजक व चित्रकूट इंटरनॅशनल स्कूलचे संचालक संजय चव्हाण व नंदराज केटरर्स संचालक राजेंद्र उदागे यांना तर सामाजिक कार्याबद्दल कर्म तपस्वी पुरस्कार बालघर प्रकल्पाचे संचालक युवराज गुंड यांना देण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे जेष्ठ मार्गदर्शक व मराठा पतसंस्थेचे संस्थापक व विद्यमान चेअरमन इंजिनिअर विजयकुमार ठुबे हे राहणार असून या कार्यक्रमास सेवानिवृत्त आयएएस अधिकारी निर्मलकुमार देशमुख, सेवानिवृत्त आय ए एस अधिकारी पुरुषोत्तम भापकर, आमदार संग्राम जगताप, महानगरपालिकेच्या आयुक्त यशवंत डांगे, सार्वजनिक बांधकाम मंडळाचे अधीक्षक अभियंता इंजिनीयर विवेक माळुंदे यांच्या हस्ते या पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे. तसेच यावेळी मराठा समाजातील दहावी व बारावी तसेच इतर तत्सम पदवी व उच्च पदवी धारक ८० टक्के पेक्षा जास्त मार्क असलेले विद्यार्थ्यांचा गुणगौरव व विविध शासकीय कार्यात निवड झालेले व्यक्ती व जिल्हा व राज्य आणि राष्ट्रीय खेळाडू यांचाही सत्कार यावेळी करण्यात येणार आहे.

मराठा पतसंस्थेचे हे रोप्य महोत्सव वर्ष असून या निमित्ताने वर्षभर विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार अशी माहिती ठुबे यांनी दिली. या कार्यक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन उपाध्यक्ष बाळकृष्ण काळे, कार्यक्रमाचे संयोजक संचालक किशोर मरकड, मराठा सेवा संघाचे पदाधिकारी इंजि.श्रीकांत निंबाळकर व इंजि. बाबुराव महाडिक व संचालक मंडळाने केले आहे.




जितो अहिल्यानगर आयोजित युथॉन ३.० कार्यक्रमात सन २०२५ चा जितो जीवन गौरव पुरस्कार अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांना तर उद्योजक सौरभ बोरा व युवा कलाकार प्रणिता बोरा यांनी युथ आयकॉन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

# जितो अहिल्यानगरचा जीवन गौरव पुरस्कार छायाताई फिरोदिया यांना प्रदान


### सौरभ बोरा, प्रणिती बोरा युथ आयकॉन पुरस्काराने सन्मानित

नगर – जितो अहिल्यानगर आयोजित युथॉन ३.० कार्यक्रमात सन २०२५ चा जितो जीवन गौरव पुरस्कार अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह छायाताई फिरोदिया यांना तर उद्योजक सौरभ बोरा व युवा कलाकार प्रणिता बोरा यांनी युथ आयकॉन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. समारंभात झालेल्या या पुरस्कार प्रदान कार्यक्रमास जितो ॲपेक्सचे प्रेसिडेंट विजय भंडारी, अनिल संघवी, राजेंद्र जैन, प्रियंका परमार, सुजित भटेवरा, तृप्ती कर्नावट, गौतम मुनोत, अमित मुथा, मेघना मुनोत, अहिल्यानगरचे चेअरमन आलोक मुनोत, सेक्रेटरी तुषार कर्नावट आदी उपस्थित होते.

विजय भंडारी म्हणाले, जितो अहिल्यानगरने जीवन गौरव व युथ आयकॉन पुरस्कारांची परंपरा सुरु करून उचित कार्याचा उचित गौरव सुरु केला आहे. समाजात ठसा उमटवणारे कार्य करणारे मोजकेच व्यक्तिमत्त्व असतात. त्यांचे कार्य समाजात प्रत्येकाला कळावे, त्यापासून प्रेरणा मिळावी अशा हेतूने पुरस्काराने करण्यात येणारा सन्मान कौतुकास्पद आहे.

प्रास्ताविक व स्वागत करताना तुषार कर्नावट यांनी सांगितले की, यावर्षी जितो जीवन गौरव पुरस्कार छायाताई फिरोदिया यांना देताना विशेष आनंद होत आहे. नगरच्या सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रात फिरोदिया परिवाराचे नाव मोठे आहे. छायाताई फिरोदिया या राज्यात शैक्षणिक गुणवत्तेसाठी नावजल्या जाणाऱ्या अहमदनगर एज्युकेशन सोसायटीच्या प्रमुख कार्यवाह आहेत. संस्थेच्या सर्व शाळा गुणवत्तेसाठी ओळखल्या जातात. याशिवाय फिरोदिया या विविध सामाजिक संस्थांवरही कार्यरत असून नवरात्रीत त्यांच्यासारख्या नवदुर्गेचा सन्मान करणे अतिशय आनंददायी आहे. उद्योजक सौरभ बोरा हे खऱ्या अर्थाने युथ आयकॉन आहेत. मूळचे नगरचे असलेल्या सौरभ बोरा यांनी मुंबईत शेअर मार्केट गुंतवणुक, व्हेंचर कॅपिटल, प्रायव्हेट इक्विटी क्षेत्रात मोठी भरारी घेतली आहे. देशातील तिरूपती देवस्थानचे विश्वस्त म्हणूनही ते योगदान देत आहे. त्यांचे जीवन खऱ्या अर्थाने युवा पिढीसाठी आदर्शवत आहे. प्रणिती बोरा यांनी अतिशय कमी वयात आपल्या कलेने नगरचा नावलौकिक वाढविण्याची काम केले आहे. त्यांनी रेखाटलेल्या चित्रांचा तत्कालिन राष्ट्रपतींनीही राष्ट्रपती भवनात सन्मान केलेला आहे. कलासाधना करीत बोरा यांनी नवोदित कलाकारांसमोर आदर्श निर्माण केला आहे. चेअरमन आलोक मुनोत यांनी आभार मानले.

# नवरात्रनिमित्त डॉ.शरद कोलते यांच्या घरातील 'कोजागिरीचा चंद्र' हा देखावा



डॉ.शरद कोलते यांच्या घरातील शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त कोजागिरीचा चंद्र हा देखावा साकारण्यात आला होता.

नगर – डॉ.शरद कोलते यांच्या घरातील कुलदैवत तुळजापूरच्या देवीसमोर शारदीय नवरात्र उत्सवात उत्साहाने घटस्थापना करण्यात येते. कोलते परिवाराची तीन पिढ्यांची परंपरा जोपासण्याचे कार्य डॉ.शरद कोलते व स्वर्गीय वैशाली कोलते यांनी तीस वर्षापासून केले आहे.

या नवरात्र उत्सव काळात डॉ.शरद कोलते यांच्या घरात कोजागिरीचा चंद्र ही आरास केली आहे. या देखाव्याची सजावट प्रा.डॉ. ऋचा तांदूळवाडकर यांनी केली आहे. तसेच लाईटची व्यवस्था शैलेश यांनी केली आहे. नवरात्र उत्सव काळात या तुळजापूर देवीची नित्यनेमाने सोडोपचार पूजा श्री जोशी गुरुजी हे करीत असतात. अष्टमीच्या दिवशी कोलते परिवार व स्नेही जन तसेच गावाकडील सर्व मित्र परिवार येथे प्रसाद घेण्यासाठी येत असतात. अशी पारंपारिक शारदीय नवरात्र उत्सवाची परंपरा कोलते परिवार अखंडपणे चालवीत आहे.

या शारदिय नवरात्र उत्सवानिमित्त स्वर्गीय वैशाली कोलते यांनी जतन केलेल्या संस्कृती व परंपरेच्या केलेल्या आठवणींना उजाळा मिळाला.



सत्यसाई सेवा संघटना, मानसी डान्स अकॅडमी तर्फे भगवान श्री सत्यसाई बाबांच्या जन्मशताब्दीच्या औचित्य संगीत गायन कार्यक्रमात उपस्थित असलेले श्रीमती सुरेखा डावरे, मानसी देठे, ॲड. अभय आगरकर आदी.

# संगीत गायन, दक्षिणात्य नृत्य अविष्कारातून मातेचा जयघोष

नगर – सत्यसाई सेवा संघटना, मानसी डान्स अकॅडमी तर्फे भगवान श्री सत्यसाई बाबांच्या जन्मशताब्दीच्या औचित्य संगीत गायनावर ८० नृत्यांगनांनी भोंडला, गरबा, मंगळागौर, दांडिया, आंध्र प्रदेशातील बतकम्मा या नृत्यकलेच्या अविष्कारातून देवी महात्म्य व भारतीय संस्कृतीविषयी प्रबोधनात्मक सादर केलेल्या भक्तिमय नृत्याविष्कारांना प्रेक्षकांनी दाद दिली.

गायिका उत्कर्षा धिमते यांच्या मराठी, हिंदी, तेलुगु गायनावर निवेदिका डॉ. प्राजक्ता सावेडकर यांच्या निवेदनातून लहानांपासून प्रौढांनी फुगड्या खेळून आनंदाची उधळण करताना भाविकांनी देवी मातेचे रूप डोळ्यात साठवत भक्तिरसात मंत्रमुग्ध झाल्या होत्या.

नृत्यसाधनेतील तपस्वी योगदानाबद्दल अंजली नृत्यालयाच्या श्रीमती सुरेखा डावरे, मानसी डान्स अकॅडमी मंगळागौर टीमच्या संचालिका मानसी देठे यांचा विशाल गणपती ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. अभय आगरकर यांच्या हस्ते मानपत्र प्रदान करून विशेष सन्मान करण्यात आला. सूफी गायक पवन नाईक हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी ज्येष्ठ साई साधक व मार्गदर्शक प्रा. आर जी कुलकर्णी, प्रा. सौ. ज्योती कुलकर्णी, अमोल सप्तर्षी, आरती सप्तर्षी, नलिनी भालेराव, शोभा दुसा, श्रुती केकडे, नंदलाल भालेराव यांनी मान्यवरांचा सन्मान केला. श्री सत्यसाई सेवा समितीचे जिल्हाध्यक्ष अशोक कुरापाटी यांनी भगवान श्री सत्यसाई बाबांच्या विश्वव्यापी मानवी कल्याण अवतार कार्याची माहिती दिली. भगवान बाबांच्या आरतीने, श्रीसूक्त व महिषासुर स्तोत्र पठणाने सोहळ्याची सांगता झाली.

# विश्वभारती अभियांत्रिकी महाविद्यालयात वृक्षारोपण



विश्वभारती अभियांत्रिकी महाविद्यालयात वृक्षारोपण करुन विद्यार्थ्यांनी घेतला पर्यावरण संवर्धनाचा संकल्प.

नगर – बदलत्या पर्यावरणीय परिस्थितीत हरितजागृती निर्माण करणे ही काळाची गरज आहे. या उद्देशाने विश्वभारती अकॅडमीच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात ग्रीन क्लब असोसिएशन अंतर्गत समुदाय सहभाग प्रकल्पाचा एक भाग म्हणून वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात महाविद्यालयातील सर्व शाखांतील द्वितीय वर्षाचे विद्यार्थी उत्साहाने सहभागी झाले. कार्यक्रमाचे उद्घाटन शैक्षणिक अधिष्ठाता प्रा. व्ही. एस.चौधरी यांच्या हस्ते झाले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात पर्यावरण संरक्षणासाठी युवकांनी पुढाकार घेण्याचे महत्त्व अधोरेखित केले. आज झाडे लावणे म्हणजे उद्याच्या पिढ्यांसाठी स्वच्छ हवा, पाणी आणि निरोगी वातावरणाची बीजे पेरणे होय.

विद्यार्थ्यांनी केवळ शिक्षणापुरते मर्यादित न राहता समाजहितासाठी काम करण्याची सवय जोपासली पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. यानंतर विद्यार्थ्यांनी महाविद्यालयीन परिसरात वृक्षारोपण करून हरितविश्वाचा संकल्प केला. प्राध्यापक वर्ग आणि विभाग प्रमुखांसह विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची औषधी, फळझाडे व शोभेची झाडे लावली. प्रत्येक विद्यार्थ्याने लावलेल्या झाडांच्या देखभालीची जबाबदारी स्वतःकडे स्वीकारल्यामुळे हा उपक्रम सातत्यपूर्ण ठरणार आहे.

या उपक्रमात महाविद्यालयाचे सर्व विभागप्रमुख, प्राध्यापकवर्ग यांचाही सक्रिय सहभाग होता. पर्यावरण जतन ही केवळ सरकार किंवा सामाजिक संस्थांची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची नैतिक जबाबदारी आहे. शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यामध्ये हे संस्कार रुजवणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्राध्यापकांनी नमूद केले.

या वृक्षारोपण उपक्रमामुळे महाविद्यालयीन परिसर अधिक हिरवागार होणार असून, विद्यार्थ्यामध्ये पर्यावरण संवर्धनाबाबत जाणीव निर्माण झाली आहे. हरित महाविद्यालय या संकल्पनेला अनुसरून संस्था 'शाश्वत विकास' या दृष्टीने पुढे वाटचाल करत असल्याचे प्रत्यक्ष दाखला या उपक्रमातून मिळाला. विद्यार्थ्यामध्ये सामूहिक जबाबदारी, पर्यावरणाबद्दलची संवेदनशीलता आणि समाजहितासाठी काम करण्याची वृत्ती दृढ झाली आहे.हा कार्यक्रम विद्यार्थ्यासाठी जीवनमूल्ये रुजविणारा प्रेरणादायी अनुभव ठरला.या उपक्रमामुळे भावी पिढ्यांसाठी स्वच्छ, निरोगी व संतुलित पर्यावरण निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांचा हातभार लागणार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

